**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 878 नाग/2011**

श्री भोला गरीबदास बैसवारे
बैरागीपुरा, नाईक तलाव, नागपूर
ता. जि. नागपूर – 2 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री निनावे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रवर्तन अधिक्षक
नागपूर महानगर पालिका नागपूर
महात्मा फुले, कॉटन मार्केट, नागपूर
2) श्री आर. एस. चकोले
जन माहिती अधिकारी तथा प्रवर्तन निरीक्षक
नागपूर महानगर पालिका नागपूर
महात्मा फुले, कॉटन मार्केट, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.9.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.6.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 17.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 2.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 11.2.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रवर्तन निरीक्षक नागपूर महानगर पालिका नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन दि. 1.12.2010 ते दि. 12.2.2011पर्यंत या कालावधीत नागपूर शहरातील अतिक्रमण तोडण्याबाबतच्या कार्यवाही संदर्भात माहिती मागितलेली होती. तसेच माहिती मध्ये संबंधित नस्तीवर कार्यालयीन टिपणीच्या प्रती तसेच आवक जावक रजिस्टरच्या प्रती आणि या संदर्भात धारीका अन्य विभागाकडे अभिप्रायासाठी पाठविलेली असल्यास त्या अभिप्रायाची प्रत इत्यादी माहिती त्यांनी मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती विलंबाने प्राप्त झाली त्या माहिती मध्ये आवक जावक रजिस्टरच्या झेरॉक्स प्रती तसेच अतिक्रमण तोडण्याबाबत केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात त्यांना त्रोटक माहिती प्राप्त झाली. मात्र त्या माहिती मध्ये प्रत्येक धारीकेतील नोटींगच्या प्रती त्यांना मिळालेल्या नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा प्रवर्तन निरीक्षक नागपूर महानगर पालिका नागपूर श्री चकोले हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रवर्तन अधिक्षक श्री निनावे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री चकोले यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 11.2.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने दि. 1.12.2010 ते दि. 12.2.2011पर्यंत या कालावधीत नागपूर शहरातील अतिक्रमण तोडण्याबाबतची माहिती मागितलेली होती. तथापी अपीलकर्त्याने संपूर्ण नागपूर शहरातील अतिक्रमण

तोडण्याबाबची माहिती मागितलेली असल्यामुळे सदरची माहिती संकलीत करण्यास विलंब लागण्याची दाट शक्यता आहे असे दि. 10.3.2011 च्या पत्राने कळविले. त्यानंतर अपीलकर्त्यास संकलित झालेली माहिती दि. 25.3.2011 रोजी उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे सुनावणीत मान्य केले. मात्र सदरची माहिती ही त्रोटक आणि अपूर्ण स्वरुपाची आहे तसेच अतिक्रमण तोडण्याबाबतच्या संदर्भातील नोटींगची प्रत त्यांना अद्याप मिळालेली नाही म्हणून त्यांना नोटींगच्या प्रती सह सर्व अतिक्रमण तोडलेल्या धारीकेमधील माहिती त्यांना पाहिजे आहे. त्यावर जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अतिक्रमण तोडण्याबाबतच्या संदर्भात नागपूर महानगर पालिकेने केलेल्या कार्यवाहीच्या सर्व नस्त्या अपीलकर्त्यास निरीक्षणासाठी ते उपलब्ध करुन देतील आणि निरीक्षणानंतर अपीलकर्त्यास पाहिजे असलेल्या नोटींगच्या प्रती तसेच इतर विभागाचे अभिप्राय असल्यास त्यांच्याही प्रती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देण्यास जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगा पुढे मान्य केले. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी या दोघांनी अपीलकर्त्यास अतिक्रमण तोडण्याबाबतच्या संदर्भात वर नमुद केलेल्या कालावधीतील सर्व धारीका निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्याव्या. आणि निरीक्षणानंतर अपीलकर्त्यास पाहिजे असलेल्या नोटींगच्या प्रती किंवा अभिप्रायाची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

2) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास निरीक्षणासाठी तारीख व वेळ कळवावी आणि त्याप्रमाणे अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून संबंधीत नस्तीचे निरीक्षण करुन घेवून निरीक्षणानंतर पाहिजे असलेल्या माहितीच्या प्रती विनामुल्य प्राप्त करुन घ्याव्या.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2190-2191

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 877 नाग/2011**

श्री सतिश रामकृष्णराव धाबेकर
क्वार्टर नं.5/84, छोटा ताजबाग जवळ
रघुजी नगर नागपूर
ता. जि. नागपूर –440024 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. स व सु विभाग गोंदिया
जुने पावर हाऊस रामनगर गोंदिया
2) श्री राजपाल रामदास गेडाम सहाय्यक अभियंता
जन माहिती अधिकारी
महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. स व सु विभाग गोंदिया
जुने पावर हाऊस रामनगर गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.9.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 17.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 2.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 2.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. स व सु विभाग गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन कंपनी च्या अत्यावश्यक कामाकरीता मंजूर पर्मनेंट इम्प्रेस व टेम्प्ररी ॲडव्हांन्स पेक्षा जास्त वेळोवेळी खर्च झालेली रक्कम परत मिळणेबाबत मी सादर केलेले दि. 10.4.2008 रोजी अर्ज सादर केला होता त्या अर्जामध्ये केलेल्या इम्प्रेस सिट च्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली मात्र सदरची माहिती अपूर्ण असल्यामुळे त्यांनी प्रथम अपील कार्यकारी अभियंता यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपील दाखल केल्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता श्री राजपाल रामदास गेडाम हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांच्या वतीने त्यांनाच प्राधिकृत करण्यात आलेले होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 2.11.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 16.11.2010 रोजी प्राप्त झाला होता. आणि अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. 6.12. 2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविले त्यानुसार अपीलकर्त्याने दि. 18.12.2010 रोजी माहितीचे शुल्क भरणा केले. त्यानंतर अपीलकर्त्यास दि. 24.12.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. आणि प्रथम अपीलानंतर पुन्हा दि. 25.3.2011 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले ही माहिती दि. 24.12. 2010 रोजी प्राप्त झाल्याचे आणि दि. 25.3.2011 ची माहिती देखील प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे

सुनावणीत मान्य केले. मात्र त्यांना अद्यापही इम्प्रेस सिट नं. 2136, 2144 आणि 2147 याबाबतची त्यांना माहिती मिळाली नाही असे त्यांनी सांगितले. त्यावर जन माहिती अधिकारीयांनी आयोगा पुढे सांगितले की या इम्प्रेस सिटच्या संदर्भात अपीलकर्त्याने तारखा नमुद केलेल्या नाहीत तथापी अपीलकर्त्याने आयोगा समोर सदरची इम्प्रेस सिट ज्या तारखेला सादर केलेले आहे त्याची पोच आयोगा समोर दाखविली. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे सांगितले की या इम्प्रेस सिटच्या झेरॉक्स प्रती त्यांना उपलब्ध करुन दिल्यास इम्प्रेस सिट नं. 2136, 2144 आणि 2147 याबाबतची माहिती देखील त्यांना उपलब्ध करुन देण्याचे त्यांनी मान्य केले म्हणून प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांचेकडे इम्प्रेस सिट नं. 2136, 2144 आणि 2147 हया त्या कार्यालयात सादर केल्याच्या झेरॉक्स प्रती जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन द्याव्या आणि त्यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या कार्यालयात कागदपत्राचा शोध घेवून या सिटची माहिती किंवा वस्तुस्थिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे इम्प्रेस सिट नं. 2136, 2144 आणि 2147 च्या संदर्भात झेरॉक्स प्रती जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध करुन द्याव्या. सदरच्या झेरॉक्स प्रती जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध झाल्यानंतर 7 दिवसाचे आंत अपीलकर्त्यास विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2193-2194

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 883 नाग/2011

श्री सुरेश शालिकराम दुरूगकर
श्रीनगर, चंद्रशेखर वार्ड, बब्बाभवनच्या जवळ, गोंदिया
पे. ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डी. ए. सपाटे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय आमगाव
ता. आमगाव जि. गोंदिया
2) श्री अपाले नायब तहसिलदार
जन माहिती अधिकारी
तहसिल कार्यालय आमगाव
ता. आमगाव जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.9.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.6.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 17.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 2.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 26.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी तहसिल कार्यालय आमगाव यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन तहसिलदार आमगाव यांचे नावाने बॅकेत असलेल्या खात्याबद्यल तसेच त्या खात्याच्या चेकबद्यल आणि बॅक व्यवहाराबद्यल माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील तहसिलदार यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी झाली नाही आणि प्रथम अपीलाचा निर्णय दिला नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार श्री अपाले हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार आमगाव श्री डी. ए. सपाटे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार श्री अपाले यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 26.7.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. परंतू सदरचा माहितीचा अर्ज श्री बेलपांडे नायब नाझर यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे सदरचा अर्ज माहिती देण्यासाठी सादर केला नाही म्हणून अपीलकर्त्यास मुदतीत माहिती देता आली नाही. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील तहसिलदार आमगाव यांचेकडे दाखल केले. परंतू सदरचा अपील अर्ज श्री बेलपांडे नायब नाझर यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार यांचेकडे दाखल केला नाही. म्हणून प्रथम अपीलाचा निर्णय देता आला नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार आमगाव यांनी आयोगापुढे सांगितले. तथापी आता अपीलकर्त्याने मागितलेली माहिती यांनी तयार केलेली असून सदरची माहिती अपीलकर्त्यास देण्याची तयारी जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर दाखविली. सदरची माहिती अपीलकर्त्याने आयोगा समोर स्वीकृत केली. तथापी सदरच्या माहितीमध्ये तहसिलदार यांच्या खात्यातून जे चेक दिलेले आहे त्याची माहिती या माहिती मध्ये नाही असे अपीलकर्त्याने आयोगा समोर सांगितले. त्यावर जन माहिती अधिकारी श्री अपाले आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार श्री सपाटे यांनी आयोगा पुढे सांगितले की अपीलकर्त्यास चेकच्या संदर्भातील माहिती देखील त्वरीत उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यावर अपीलकर्त्याने असे सांगितले की त्यांना चेकची माहिती लवकरात लवकर उपलब्ध करुन द्यावी. तथापी सदरची माहिती उपलब्ध होण्यास विलंब झाल्याबद्यल संबंधीता विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये शास्तीची कार्यवाही करावी असे अपीलकर्त्याने आयोगा समोर सांगितले.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याचा दि. 26.7. 2010 चा माहितीचा अर्ज श्री बेलपांडे नायब नाझर यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे सदरचा अर्ज माहिती देण्यासाठी सादर केला नाही तसेच अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केल्यानंतर प्रथम अपीलाचा अर्ज देखील श्री बेलपांडे नायब नाझर यांनी तहसिलदार यांचेकडे सुनावणीसाठी आणि प्रथम अपीलाचा निर्णय देण्यासाठी सादर केला नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती देण्यास विलंब झालेला आहे आणि सदरच्या विलंबास श्री बेलपांडे नायब नाझर हे जबाबदार दिसून येतात म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 5 (5) नुसार त्यांना सहाय्यक जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येत असून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध होण्यास झालेल्या विलंबाबद्यल त्यांना जबाबदार धरण्यात येत आहे. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) अन्वये रु.10000/- ची शास्तीची कार्यवाही कां करू नये त्याचा लेखी खुलासा त्यांनी हा आदेश प्राप्त झाल्यापासून 15 दिवसाचे आंत आयोगाकडे सादर करणे आवश्यक राहिल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास वर नमुद केल्याप्रमाणे बॅंकेच्या चेक संदर्भातील माहिती विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) श्री बेलपांडे नायब नाझर यांनी माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे त्वरीत सादर केला नाही तसेच त्यांनी तसेच प्रथम अपीलाचा अर्ज देखील प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार यांचेकडे सादर केला नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध होण्यास विलंब झालेला दिसून येतो. म्हणून विलंबाबद्यल त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) अन्वये रु.10000/– ची शास्ती कां लादण्यात येवू नये याचा लेखी खुलासा त्यांनी हा आदेश प्राप्त झाल्यापासून 15 दिवसाचे आंत आयोगाकडे सादर करावा.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2194-2196

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 882 नाग/2011**

श्री सुरेश शालिकराम दुरूगकर
श्रीनगर, चंद्रशेखर वार्ड, बब्बाभवनच्या जवळ, गोंदिया
पे. ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) श्री टेडे नायब तहसिलदार
जन माहिती अधिकारी
तहसिल कार्यालय गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.9.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.6.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 17.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 2.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 29.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी तहसिल कार्यालय गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन तहसिलदार या नावाने किती बॅक खाते आहे आणि या खात्यामधून झालेलया व्यवहाराचे विवरणपत्र तसेच रामनगर गोडाऊन संदर्भात आणि इतर मुद्यां संदर्भात 1 ते 9 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना 1 ते 8 मुद्यांची माहिती प्राप्त झाली पण मुद्या क्र. 9 अपंग लाभार्थ्याच्या बाबत माहिती प्राप्त झाली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयात अपूर्ण माहिती पुरविली असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास संपूर्ण माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिला. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले. आणि 1 ते 8 मुद्यांची मिळालेली माहिती ही विलंबाने प्राप्त झाल्यामुळे संबंधिता विरुध्द कार्यवाही करावी अशी मागणी त्यांनी केली.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तहसिल कार्यालय गोंदिया श्री टेडे नायब तहसिलदार हे उपस्थित होते. तसेच पुरवठा विभागाचे वरीष्ठ लिपीक श्री सी. एम. रंगारी अन्न पुरवठा विभाग हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री सी. एम. रंगारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 29.5.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्या अर्जाला अनुसरुन त्यांनी अपीलकर्त्यास दि. 22.8. 2011 रोजी धान्य विभागाशी संबंधीत माहिती उपलब्ध करुन दिली. तसेच जन माहिती अधिकारी श्री टेडे नायब तहसिलदार संजय गांधी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याच्या दि. 29.5.2010 च्या माहितीचा अर्जातील संजय गांधी योजनेच्या संदर्भातील माहिती त्यांच्याशी संबंधीत होती. तथापी सदरचा अर्ज त्यांच्याकडे जन माहिती अधिकारी यांनी हस्तांतरण केला नाही. मात्र अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केल्यानंतर तहसिलदार यांच्याकडील प्रथम अपीलाच्या निर्णयानुसार अपीलकर्त्यास संजय गांधी योजनेच्याबाबतीत माहिती उपलब्ध करुन दिली असे त्यांनी आयोगापुढे सुनावणीत सांगितले.

5. अपीलकर्ता यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की त्यांच्या दि. 29. 5.2010 च्या माहितीच्या अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. 22.8.2011 च्या पत्राने त्यांना मुद्या क्र. 3,4,5,7 आणि 8 यांची माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती विलंबाने उपलब्ध झाली तसेच मुद्या क्र.9 ची माहिती म्हणजे अपंगाबद्दलची माहिती त्यांना मिळाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याचा दि. 29.5. 2010 चा माहितीचा अर्ज श्री रंगारी अन्न पुरवठा विभाग यांच्याकडे प्राप्त झाला होता. त्यांनी अपीलकर्त्यास त्यांच्याशी संबंधित असलेल्या मुद्या क्र. 3,4,5,7 आणि 8 यांची माहिती दि. 22.8.2011 च्या पत्राने उपलब्ध करुन दिली. बाकी माहितीच्या संदर्भात माहितीचा अर्ज त्या त्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे हस्तांतरण केला नाही. म्हणून अपीलकर्त्यास 30 दिवसात माहिती उपलब्ध झाली नाही प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर अपीलकर्त्यास संजय गांधी योजनेची माहिती उपलब्ध झालेली दिसून येते. म्हणून माहिती देण्यास विलंब झाल्याबद्दल श्री रंगारी हे जबाबदार दिसून येतात. श्री रंगारी यांनी त्यांच्याशी संबंधित असलेली माहिती देखील अपीलकर्त्यास दि. 22.8.2011 रोजी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. या विलंबाबद्दल त्यांना खुलासा विचारला असता त्यांनी कार्यबाहुल्यामुळे अपीलकर्त्यास 30 दिवसात माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे सांगितले. तथापी त्यांचा खुलासा मान्य करण्यासारखा नाही म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत श्री टेडे नायब तहसिलदार यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जातील मुद्दा क्र.9 च्या संदर्भातील त्यांच्याकडे दि. 26.3.2011 च्या अपंगाच्या शिबिरा बाबतची जी माहिती उपलब्ध आहे ती माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.
2) श्री रंगारी अन्न पुरवठा विभाग यांनी अपीलकर्त्याच्या दि. 29.5.2010 च्या माहितीचा अर्जाला अनुसरुन 30 दिवसात त्यांच्याशी संबंधित असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही तसेच सदरचा माहितीचा अर्ज श्री रंगारी यांनी श्री टेडे नायब तहसिलदार यांच्याकडे हस्तांतरण केलेला नाही म्हणून विलंबाबद्दल त्यांना जबाबदार धरण्यात येत असून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (2) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे.
3) सदरच्या शिस्तभंगाची कार्यवाही सक्षम अधिका–याने करावयाची असून त्यासाठी तहसिलदार गोंदिया यांनी सदरच्या निर्णयाची एक प्रत सक्षम अधिकारी यांच्याकडे शिस्तभंगाच्या कार्यवाहीसाठी पाठवावी.
4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.2199-2201

जा.क्र.––––––––– दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 887 नाग/2011**

श्री घनश्याम उर्फ बाळा वामणराव परणकर
गणपती वार्ड आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री अ. तु. देवगडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
विदर्भ सिंचन विकास महामंडळ, (पिपरी कार्यालय) वर्धा
ता. जि. वर्धा
2) जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता
विदर्भ सिंचन विकास महामंडळ वर्धा
ता. जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.9.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.6.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 17.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 3.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही. आजच्या सुनावणीस उप विभागीय अभियंता निम्न वर्धा प्रकल्प पुनर्वसन उपविभाग क्र. 1 श्री एस. एन. चौधरी हे उपस्थित होते. तसेच जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री देवगडे हे उपस्थित होते.

3. आजच्या सुनावणीस श्री चौधरी उप विभागीय अभियंता यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की प्रस्तुत प्रकरणी जन माहिती अधिकारी म्हणून त्यांना घोषित करण्यात आलेले नाही. परंतू अपीलकर्त्याने त्यांचा दि. 11.4.2011 चा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांचेकडे न करता उप विभागीय अभियंता यांच्याकडे सादर केला. म्हणून अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अर्ज दि. 3.5.2011 च्या पत्राने कार्यकारी अभियंता यांचेकडे पाठविला. त्यानंतर कार्यकारी अभियंता यांनी जन माहिती अधिकारी या नात्याने अपीलकर्त्यास दि. 1. 6.2011 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. सदरचे दि. 1.6.2011 चे पत्र कार्यकारी अभियंता यांनी त्यांच्या कार्यालयातील जावक क्र. 1090/प्रशासन 2/11 दि. 1.6.2011 रोजी पोस्टाद्वारे पाठविल्याचे आयोगा पुढे सांगितले आणि त्याबाबतचा पुरावा आयोगासमोर सादर केला. त्यावरुन दि. 1.6.2011 चे पत्र पाठविल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले.

4. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री देवगडे यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की प्रस्तुत प्रकरणात प्रथम अपीलीय अधिकारी हे अधिक्षक अभियंता नागपूर पाटबंधारे मंडळ नागपूर हे आहेत. मात्र अपीलकर्त्याने त्यांच्याकडे प्रथम अपील दाखल न करता

प्रथम अपील त्यांच्याकडेच दाखल केले. तथापी अपीलकर्त्यास माहिती पाहिजे असल्यानें त्यांनी दि. 1.6.2011 च्या पत्राने त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती पाठविल्याचे आयोगा पुढे सांगितले. तसेच त्यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचे स्वरुप हे प्रश्नार्थक स्वरुपाचे आहे. मात्र अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही दिलेल्या मोबदल्याच्या स्वरुपात असल्यामुळे निम्न वर्धा धरणाच्या बुडीत क्षेत्रात गेलेल्या विविध साहित्याचा मोबदला देण्याची कार्यवाही ही महसूल विभागाच्या भूअर्जन अधिकारी विदर्भ पाटबंधारे विकास मंडळ वर्धा यांच्या कडून करण्यात येत असते. म्हणून त्यासाठी अपीलकर्त्याने विशेष भूअर्जन अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा अशी माहिती उपलब्ध करुन देण्यात आल्याच्या श्री देवगडे यांनी आयोगा समोर स्पष्ट केले.

5. उप विभागीय अभियंता आणि जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात कार्यकारी अभियंता यांनी अपीलकर्त्यास दि. 1.6.2011 च्या पत्राने कळविल्याचे दिसून येते. म्हणून अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2203-2204

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 885 नाग/2011**

श्री दिपक महेन्द्र पांडेय
चुडी मोहल्ला, वार्ड नं. 10, पुलगाव
ता. देवळी जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्रीमती सुलोचना निगडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक
जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा
ता. जि. वर्धा
2) श्री डी. बी. वाघ अव्वल कारकून
जन माहिती अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा
ता. जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.9.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 17.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 3.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे उशिराने उपस्थित झाले तसेच उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे सुनावणी संपल्यानंतर कार्यालयात उपस्थित झाले. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 30.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन जैन समाजाला अल्पसंख्यांक समुदाय म्हणून महाराष्ट्र शासनाकडून मंजुरी मिळालेल्या शासन निर्णयाची प्रत आणि मिळणा–या सुविधा इत्यादी बाबत 1 ते 6 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 30.12. 2010 च्या पत्राने 1 ते 6 मुद्यां माहिती प्राप्त झाली त्यामध्ये असे नमुद केले की जैन समाजातील मागणी बद्यल शासनाकडून असा कोणताही निर्णय त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाला नाही असे त्यांना कळविले. म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. परंतू त्यांचे प्रथम अपील खारीज करण्यात आले आणि त्यामध्ये देखील असे नमुद केले की शासनाकडून जैन समाजाला अल्पसंख्यांक घोषित केल्याची कोणतीही माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही म्हणून अपील खारीज करण्यात येत आहे असे प्रथम

अपीलाच्या निर्णयात नमुद केले. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा श्री डी. बी. वाघ अव्वल कारकून हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक श्रीमती सुलोचना निगडे हया उपस्थित होत्या. त्यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात कोणताही शासन निर्णय त्यांच्या कार्यालयात प्राप्त झालेला नाही आणि ही माहिती अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 30.12.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली आहे.

4. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास वर नमुद केल्याप्रमाणे माहिती अर्जाला अनुसरुन आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2206-2207

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 884 नाग/2011

श्री शरद गोपाळराव डोणेकर
डोणेकर सभागृह मेर रोड कन्हान
ता. पारशिवनी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आर. डी. पाटील
प्रथम अपीलीय अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी
पंचायत समिती कार्यालय पारशिवनी
ता. पारशिवनी जि. नागपूर
2) श्रीमती विमला गिरगुसे अधिक्षक
जन माहिती अधिकारी
पंचायत समिती कार्यालय पारशिवनी
ता. पारशिवनी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.9.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.6.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 17.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 3.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक पंचायत समिती पारशिवनी श्रीमती विमला गिरगुसे हया उपस्थित होत्या. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती पारशिवनी श्री आर. डी. पाटील हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्रीमती विमला गिरगुसे यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 11.1.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 14.1. 2011 रोजी प्राप्त झाला होता. सदरच्या अर्जात अपीलकर्त्याने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद नागपूर यांच्या कडील दि. 16.12.2010 च्या पत्रान्वे अतिरिक्त शिक्षकांचे

समायोजना संदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली होती. त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 2.2.2011 रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. आणि त्यामध्ये त्यांच्या कार्यालयाने अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन केलेल्या कार्यवाही बाबतच्या पत्राची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याची पोच जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर दाखविली. त्यावरुन अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध झाल्याचे दिसून येते. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2209-2210

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 771 नाग/2011**

श्री अशोक किसनराव कोंडावार
प्लॉट नं. 7, मिलींद सोसायटी नरेन्द्र नगर नागपूर
ता. जि. नागपूर –15 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
विधी व न्याय विभाग
मंत्रालय मुंबई 32
2) जन माहिती अधिकारी
विधी व न्याय विभाग
मंत्रालय मुंबई 32 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.9.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 17.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 6.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी यांच्या वतीने अधिक्षक विधी व न्याय विभाग नागपूर श्री शेख हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही.

3. मात्र आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी विधी व न्याय विभाग यांच्या वतीने श्री शेख अधिक्षक विधी व न्याय विभाग नागपूर हे उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 25.1.2011 चा माहितीचा अर्ज प्रथमत जन माहिती अधिकारी तथा सचिव महसूल व वन विभाग यांचेकडे दाखल केला होता. महसूल व वन विभागाने सदरचा माहितीचा अर्ज त्यानंतर दि. 3.2.2011 च्या पत्राने सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग यांचेकडे हस्तांतरण केला व त्याची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. त्यानंतर सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग यांनी सदरचा अर्ज दि. 25.2.2011 च्या पत्राने विधी व न्याय विभागाला पाठविला. त्यानंतर पुन्हा दि. 1.4.2011 च्या पत्राने अपीलकर्त्यास सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाने असे कळविले की आपला माहितीचा विषय हा विधी व न्याय विभागाशी संबंधित असल्यामुळे सदरचा अर्ज विधी व न्याय विभागाकडे हस्तांतर करण्यात आला आहे असे अपीलकर्त्यास सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाने कळविलेले आहे.

4. सदरचा माहितीचा अर्ज विधी व न्याय विभागाकडे प्राप्त झाल्यानंतर प्रस्तुत प्रकरणात त्या विभागामध्ये कार्यालयीन टिपणी तयार करण्यात आली. त्यामध्ये असे नमुद केले की नोमॅडीक ट्राईब (एन.टी.) मध्ये पालेवार जातीसाठी न्यायालयात दावा दाखल करण्यासाठी लागणा–या कोर्ट फी बद्यल सुट याबाबतची माहिती त्यांनी मागितलेली आहे आणि त्याबाबतचे नोटिफिकेशन त्यांनी मागितलेली आहे. तथापी मुंबई न्यायालयीन फी अधिनियम 1959 मधील कलम 46 अन्वये न्यायालयीन फी कमी करणे अथवा न्यायालयीन फी मध्ये सुट देणे याबाबत शासन राजपत्र या संबंधी अधिसूचना प्रसिध्द करू शकते. मुंबई न्यायालयीन फी सुट देणेबाबत महसूल व वन विभागाकडून वेळोवेळी अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे. यास्तव एन.टी. पालेवार जातीसाठी

न्यायालयीन फी मध्ये सुट मिळण्याबाबत अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे अथवा नाही याबाबतची माहिती महसूल व वन विभागाकडून अर्जदारास प्राप्त होणे आवश्यक आहे आणि म्हणून सदरची धारीका ही विधी व न्याय विभागाकडून महसूल व वन विभागाकडे पाठविलेली दिसते. त्यानंतर महसूल व वन विभागाच्या जन माहिती अधिकारी यांनी दि. 17.8.2011 च्या पत्राने अपीलकर्त्यास अशी माहिती उपलब्ध करुन दिली की आपणास आवश्यक असलेल्या दस्तऐवजाचा क्रमांक दिनांक निश्चितपणे उपलब्ध करुन दिल्यास उपलब्धते नुसार त्याची प्रत देण्यात येईल तसेच आपणास असेही कळविण्यात येते की शासन अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द करण्यात येत असल्यामुळे त्याच्या प्रती शासकीय मध्यवर्ती मुद्रणलयातून उपलब्ध करुन घेणे अभिप्रत आहे. आणि याबाबत विषयांकित प्रकरणाचे प्रथम अपीलीय अधिकारी श्री राजेश नार्वेकर उपसचिव महसूल व वन विभाग हे आहेत असे देखील महसूल व वन विभाग यांनी अपीलकर्त्यास कळविलेले आहे.

4. विधी व न्याय विभागाकडून उपस्थित असलेले श्री ए. एन. शेख यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की त्यांनी सादर केलेल्या टिपणीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही महसूल व वन विभागाशी संबंधित आहे आणि महसूल व वन विभागाच्या जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 17.8.2011 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. तथापी त्याबाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले नसल्यास अपीलकर्त्याने महसूल व वन विभाग यांच्या उपसचिवाकडे प्रथम अपील दाखल करणे आवश्यक आहे आणि प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर त्यांचे समाधान झाले नाही तर आयोगापुढे त्यांना द्वितीय अपील दाखल करण्याची मुभा आहे. यास्तव अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांनी प्रस्तुत प्रकरणी प्रथमतः उपसचिव महसूल व वन विभाग यांचेकडे प्रथम अपील दाखल करावे आणि प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर त्यांचे समाधान न झाल्यास त्यांना राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याची मुभा राहिल.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2212-2213

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 770 नाग/2011

श्री देवराव गंगाराम डेकाटे
मु. पो. सिर्सी
ता. उमरेड जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री चौधरी
जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक(आस्थापना)
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.9.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 6.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 13.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक(आस्थापना) जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांनी अपील क्रमांक 603/2010 आदेश पारीत दि. 11.6.2010 मध्ये जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी उमरेड यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते त्या अनुषंगाने कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापि त्यांना 30 दिवसात कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील अतिरिक्त जिल्हाधिकारी नागपूर यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक श्री चौधरी हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 13.12.2010

चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 22.12.2010 रोजी प्राप्त झाला होता. त्यावेळेला तत्कालीन जन माहिती अधिकारी म्हणून श्री सुनिल कोरडे हे कार्यरत होते. त्यांनी 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही तसेच अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केल्यानंतर प्रथम अपीलाच्या निर्णयात देखील माहिती उपलब्ध करुन देण्याचे कोणतेही आदेश नसल्यामुळे अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. तथापी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात उपविभागीय अधिकारी उमरेड यांच्याकडे दि. 30.8.2011 रोजी पत्र पाठवून त्यांच्याकडून आयोगाच्या दि. 11.6.2010 च्या आदेशाप्रमाणे उपविभागीय अधिकारी उमरेड यांच्या विरुध्द शिस्तभंगाच्या कार्यवाहीचा प्रस्ताव आवश्यक ते दाखले व अभिप्रायासह मागविलेले आहे. सदरची माहिती प्राप्त झाल्यानंतर या प्रकरणात योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 13.12.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी म्हणून श्री सुनिल कोरडे यांनी अपीलकर्त्यास 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. तथापी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की दि. 30.8.2011 च्या पत्राने उपविभागीय अधिकारी उमरेड यांना पत्र पाठवून संबंधिता विरुध्द कार्यवाही करण्याचा प्रस्ताव आवश्यक ते दाखले व अभिप्रायासह मागितलेली आहे आणि सदरचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्याबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे सांगितले. म्हणून ही वस्तुस्थिती विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविणे योग्य होईल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास असे कळवावे की त्यांनी दि. 30.8.2011 च्या पत्राने उपविभागीय अधिकारी उमरेड यांना पत्र लिहून संबंधिता विरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्याकरीता आवश्यक ते दाखले त्याच्या अभिप्रायासह प्रस्ताव मागितलेला आहे. सदरचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास विनामुल्य रजिस्टर पोस्टाने कळवावे.

2) तत्कालीन जन माहिती अधिकारी म्हणून श्री सुनिल कोरडे यांनी अपीलकर्त्याच्या दि. 13.12.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही

माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. म्हणून माहिती उपलब्ध होण्यास विलंब झालेला आहे. म्हणून विलंबाबद्यल माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) अन्वये रु. 5000/– शास्ती कां लादण्यात येवू नये याबद्यलचा लेखी खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत आयोगाकडे सादर करावा.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री सुनिल कोरडे यांचेकडे खुलासा करण्यासाठी त्वरीत पाठवावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2209-2211

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 772 नाग / 2011**

श्री राजु किसन वानखेडे
श्रीराम वार्ड बल्लारपूर
ता. बल्लारपूर जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर
2) श्री लटारू काशिनाथ बलकी
जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य
माऊंट विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय बल्लारपूर
गणपती वार्ड बल्लारपूर
ता. बल्लारपूर जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.9.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 6.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 24.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य माऊंट विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय बल्लारपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन माऊंट विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय बल्लारपूर या महाविद्यालयाचा सन 2009–2010 या शैक्षणिक वर्षाचा वार्षिक तपासणी अहवाल त्यांनी मागितलेला होता. तथापि त्यांना अहवालाची प्रत मिळाली नाही.

3. त्यावर जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य श्री लटारू काशिनाथ बलकी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की सदरचे महाविद्यालय हे कायम स्वरुपी विनाअनुदानित तत्वावर सुरु आहे. त्यामुळे या महाविद्यालयास शासनाकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणत्याही प्रकारचे अनुदान प्राप्त होत नाही त्यामुळे या महाविद्यालयास माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी लागू होत नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

3. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद चंद्रपूर तर्फे सौ. कुमरे कक्ष अधिकारी हया उपस्थित होत्या. त्यांनी देखील आयोगा पुढे असे सांगितले की सदरचे महाविद्यालय हे कायम स्वरुपी विनाअनुदानित तत्वावर सुरु आहे. त्यामुळे या महाविद्यालयास शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान किंवा वित्तीय सहाय्य मिळत नाही. त्या संदर्भात प्रायार्य यांनी शालेय शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांचे कडील दि. 24.8.2004 च्या परवानगी पत्राची प्रत आयोगासमोर सादर केली. त्यावर सदरचे महाविद्यालय हे कायम स्वरुपी विनाअनुदानित तत्वावर कार्यरत असल्याचे दिसून येते म्हणून मा. उच्च न्यायालय यांचेकडील याचिका क्र. 5132/2008 नुसार ज्या शैक्षणिक संस्थांना शासनाकडून सहाय्य प्राप्त होत नाही त्या शैक्षणिक संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी लागू होत नाही असा मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांचा निर्णय असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.2213-2214

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 896 नाग/2011**

श्री गौतम भिकाजी वासनिक
मु. पो. बुधवारी पेठ, वार्ड क्र.3
ता. उमरेड जि. नागपूर – 441203 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री म. आ. माटे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता
गोसीखुर्द उपसा सिंचन मंडळ, आंबाडी(भंडारा)
जि. भंडारा
2) श्री अ. अ. जोशी
जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
गोसीखुर्द डावा कालवा विभाग वाही(पवनी)
ता. पवनी जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.9.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.6.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 17.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 7.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 6.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता गोसीखुर्द डावा कालवा विभाग वाही(पवनी) ता. पवनी जि. भंडारा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन निविदा सुचना क्र. 1/2006–07 आणि निविदा सुचना क्र. 3/2007–08 मधील निविदेच्या संदर्भात 1 ते 7 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून मुद्या क्र. 1 ते 4 आणि 7 ची माहिती मिळाली आणि मुद्या क्र. 5 आणि 6 ची माहिती त्यांना मिळाली नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री जोशी आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता श्री माटे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री जोशी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन 1 ते 4 आणि 7 मुद्यांची माहिती यापुर्वीच उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी अपीलकर्त्याने मागितलेली मुद्या क्र. 5 आणि 6 च्या माहितीचा निश्चित स्वरुपात त्यांना बोध होत नसल्यामुळे त्यांनी अपीलकर्त्यास या माहिती बाबत चर्चा केली आणि त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास मुद्या क्र. 5 आणि 6 च्या माहितीच्या संदर्भात माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविले. तथापी अपीलकर्त्याने मुद्या क्र. 5 आणि 6 च्या माहितीचे शुल्क भरणा केले नाही म्हणून त्यांना कागदपत्राच्या स्वरुपात कोणतीही माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. याबाबत अपीलकर्त्याने आयोगा पुढे असे नमुद केले की त्यांना मुद्या क्र. 5 आणि 6 च्या संदर्भात या कामाच्या एस्टिमेटप्रमाणे एकुण खर्च किती अपेक्षित आहे आणि त्यावर

आतापर्यंत झालेला एकुण खर्च किती आहे त्याची आकडेवारी त्यांना उपलब्ध करुन द्यावी तसेच मुद्या क्र. 6 च्या संदर्भात एस्टिमेटप्रमाणे कॉक्रीट आणि मुरुम ची जाडी किंती आहे याबाबतची माहिती फक्त त्यांना पाहिजे आहे. इतर माहिती कागदपत्राच्या स्वरुपात त्यांना नको आहे असे अपीलकर्त्याने आयोगा पुढे सांगितले.

5. प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांच्या कार्यालयाकडे एस्टिमेटच्या प्रती उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे झालेल्या कामाच्या बाबत मोजमाप पुस्तीका देखील उपलब्ध आहे. त्यावर अपीलकर्त्यास मुद्या क्र. 5 आणि 6 ची माहिती उपलब्ध करुन देता येईल असे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास वर विवेचन केल्याप्रमाणे मुद्या क्र. 5 आणि 6 ची माहिती आयोगा समोर झालेल्या चर्चे नुसार आकडेवारीच्या स्वरुपात विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2216-2217

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 779 नाग/2011

श्री आनंदराव शंकरराव भानारकर
शासकीय दुध शितरण केंद्र नागभीड
ता. नागभीड जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रादेशिक दुग्ध शाळा विकास अधिकारी,
अमरावती विभाग अमरावती
कॉग्रेस नगर ता. जि. अमरावती
2) श्री शरद प्र. भगत
जन माहिती अधिकारी तथा दुग्धशाळा व्यवस्थापक
शासकीय दुध योजना नांदूरा
ता. नांदूरा जि. बुलढाणा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.9.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 7.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 22.2.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा दुग्धशाळा व्यवस्थापक शासकीय दुध योजना नांदूरा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन त्यांच्या प्रवास भत्ता देयकाविषयी आणि मुळ वेतनवाढीच्या देयकाविषयी त्यांनी माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली मात्र सदरची माहिती चुकीची असल्याने त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपील दाखल केल्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा दुग्धशाळा व्यवस्थापक श्री भगत हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने श्री चिम हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री भगत यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 22.2.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे

दि. 24.2.2011 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने त्यांच्या प्रवास भत्ता देयकाविषयी आणि मुळ वेतनवाढीच्या फरकाचे देयकाविषयी माहिती मागितलेली होती. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 17.3.2011 च्या पत्राने प्रवास भत्ता देयकाबाबत आणि मुळ वेतनवाढीच्या फरकाचे देयकाबाबत वस्तुस्थितीदर्शक माहिती पाठविली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे सुनावणीत मान्य केले. मात्र त्यांना अद्यापपर्यंत वेतन फरकाचे देयक आणि प्रवास भत्ता देयकाची रक्कम त्यांना मिळाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. मात्र प्रस्तुत प्रकरणात असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या माहितीचा अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास प्रवास भत्ता देयकाबाबत आणि मुळ वेतनवाढीच्या फरकाचे देयकाबाबत वस्तुस्थितीदर्शक माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. म्हणून अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या या दोन्ही देयकावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना दिलेली दिसून येते. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.2219-2220

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 780 नाग/2011**

श्री सुरेंद्र पुंडलिकराव रेवतकर
हनुमान मंदिर जवळ आय.यु.डि.पी.काटोल
ता. काटोल जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री शक्करवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय काटोल
ता. काटोल जि. नागपूर
2) श्री प्रशांत पाटील नायब तहसिलदार
जन माहिती अधिकारी
तहसिल कार्यालय काटोल
ता. काटोल जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.9.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 7.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 3.3.2011 रोजी जन माहिती अधिकारी तहसिल कार्यालय काटोल यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन ख. क्र. 45 आराजी 1.92 वर्ग–2 मधील फेरफाराबाबत 1 ते 5 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना दि. 26.3.2010 च्या पत्राने ग्राम अधिकारी सा. क्र. 44 काटोल यांचेकडून 1 ते 5 मुद्यांची माहिती प्राप्त झाली. मात्र सदरच्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार श्री प्रशांत पाटील हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार श्री शक्करवार हे उपस्थित होते. आणि संबंधित साझ्याचे जन माहिती अधिकारी तथा तलाठी आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी हे उपस्थित होते.

4. प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार श्री प्रशांत पाटील यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 3.3.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 5.3.2011 रोजी प्राप्त झाला होता. सदरची माहिती तलाठी काटोल यांचेशी संबंधीत असल्यामुळे अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी तलाठी कार्यालय यांचेकडे दि. 5.3.2011 रोजी पाठविण्यात आला. त्याला अनुसरुन तलाठी काटोल तथा जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती दि. 26.3.2011 च्या पत्राने

पाठविली. आणि सदरची माहिती अपीलकर्त्यास दि. 28.3.2011 रोजी प्राप्त झाली. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील तहसिलदार यांचेकडे दाखल केले. मात्र प्रस्तुत प्रकरणात प्रथम अपीलीय अधिकारी हे मंडळ अधिकारी काटोल असल्यामुळे त्यांचेकडे प्रथम अपीलाचा अर्ज पाठविला. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्यास सुनावणीसाठी बोलाविले. मात्र अपीलकर्ता सुनावणीस हजर झाले नाही म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पुन्हा दि. 26.3.2011 च्या पत्राने तलाठी यांनी पाठविलेली माहिती अपीलकर्त्यास पाठविली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे सुनावणीत मान्य केले. मात्र फेरफाराच्या संदर्भात त्यांनी तहसिलदार काटोल यांचेकडे अपील दाखल केले असल्याचे तहसिलदार यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले. आणि त्या अपीलावर नियमाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे आयोगा समोर सांगितले.

5. म्हणून अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 3.3.2011 च्या माहिती अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. 26.3.2011 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2222-2223

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 786 नाग/2011**

श्री राजकुमार डोमाजी रामटेके
श्रा. वाही(पसा)
पो. ता. पवनी जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. बी. साळवे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी
पंचायत समिती पवनी
ता. पवनी जि. भंडारा
2) श्री व्ही. एन. निशाणे
जन माहिती अधिकारी तथा सचिव
ग्रामपंचायत वाही
पो. ता. पवनी जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.9.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 8.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 1.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत वाही ता. पवनी जि. भंडारा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन अंदाजे सन 2008–09 मध्ये शासकीय योजनेतून श्री गुलाब कारु कांबळी रा. वाही यांना मंजुर झालेल्या घरकुलाच्या संदर्भात त्यांनी त्यांच्या मालकीच्या किती जागेवर क्षेत्रफळात बांधकाम केले त्याची त्यांनी माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती पवनी यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत वाही श्री निशाणे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी पंचायत समिती पवनी श्री साळवे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा सचिव श्री निशाणे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 1.10.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जात श्री गुलाब कारु कांबळी यांच्या घरकुलाबाबत माहिती मागितलेली होती. तथापि सदरचे घरकुल श्री गुलाब कारु कांबळी या नावाने मंजुर झालेले नसून सदरचे घरकुल श्री गुलाब कारु बावने या नावाने मंजुर झालेले आहे. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या अर्जातील आडनावात विसंगती असल्यामुळे माहिती देण्याबाबत संभ्रम निर्माण झाला होता. तथापी त्यानंतर अपीलकर्त्यास श्री गुलाब कारु कांबळी रा. वाही यांना इंदिरा आवास योजने अंतर्गत मंजुर झालेल्या घरकुल बांधकामाबाबत संपूर्ण माहिती तयार करण्यात आली आणि सदरची माहिती अपीलकर्त्यास आयोगा समोर उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्याने आयोगा समोर स्वीकृत करुन माहिती मिळाल्याबद्यल समाधान व्यक्त केले आणि माहिती त्यांना प्राप्त झाल्यामुळे अपील खारीज करावे असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध झाल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2225-2226

जा.क्र.———————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 788 नाग/2011 व अपील क्रमांक 789 नाग/2011**

श्रीमती सुनंदा दत्तात्रय अरमरकर
तर्फे श्री दिलीप द. अरमरकर
रेशमबाग, प्लॉट नं. 68 गजानन महाराज मंदिराचे पाठीमागे
कारपोरेशन शाळेजवळ नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आर. बी. चलवदे
प्रथम अपीलीय अधिकारी
विभागीय कृषी सहसंचालक कार्यालय नागपूर विभाग नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री ए. एन. शेंडे सहा. प्रशासन अधिकारी
जन माहिती अधिकारी
विभागीय कृषी सहसंचालक कार्यालय नागपूर विभाग नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.9.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक 18.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये अपील क्रमांक 788 नाग/2011 व अपील क्रमांक 789 नाग/2011 ही दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 8.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या दोन्ही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ती व उत्तरवादी हजर आहेत.

2. या दोन्ही द्वितीय अपीलांमधे अपीलकर्ती हे एकच आहे आणि जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी हे एकच असल्यामुळे दोन्ही अपीलांची एकत्रित सुनावणी घेण्यात आली. आणि खालीलप्रमाणे निर्णय देण्यात आला.

3. <u>**अपील क्रमांक 788 नाग/2011**</u> – आजच्या सुनावणीस अपीलकर्ती यांच्या वतीने त्यांचा मुलगा श्री दिलीप अरमरकर यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 18.3.2011 रोजी जन माहिती अधिकारी विभागीय कृषी सहसंचालक कार्यालय नागपूर विभाग नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन श्री डी. बी. अरमरकर यांच्या बडतर्फी नंतर त्यांना देण्यात येणा–या निवृत्ती विषयक लाभाबाबत माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 20.4.2011 च्या पत्राने माहिती प्राप्त झाली. मात्र त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून प्रथम अपील प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही देखील त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहा. प्रशासन अधिकारी श्री ए. एन. शेंडे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी श्री आर. बी. चलवदे
हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री ए. एन. शेंडे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 18.3.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला

होता. अपीलकर्त्याने श्री डी. बी. अरमरकर बडतर्फ कर्मचारी यांच्या बडतर्फीच्या अगोदर शिल्लक असलेल्या अर्जित रजा रोखीकरण तसेच शिल्लक भविष्य निर्वाह निधीची रक्कम व निवृत्ती वेतन लाभ आणि त्यांच्या मुळ सेवा पुस्तकातील पृष्ठ क्र. 11 ची झेरॉक्स प्रत इत्यादी माहिती मागितलेली होती. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 20.4.2011 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. आणि त्यामध्ये असे नमुद केले की श्री डी. बी. अरमरकर यांच्या बडतर्फीच्या अगोदर शिल्लक असलेल्या अर्जित रजा रोखीकरण तसेच शिल्लक भविष्य निर्वाह निधीची रक्कम अदा केलेली आहे. तसेच मुळ सेवा पुस्तकातील पृष्ठ क्र. 11 ची झेरॉक्स प्रत त्यांना देण्यात आल्याचे नमुद केलेले आहे. आणि त्याप्रमाणे पुन्हा अपीलकर्त्यास दि. 30.8.2011 च्या पत्राने श्री डी. बी. अरमरकर यांना अदा करण्यात आलेल्या भविष्य निर्वाह निधीच्या रक्कमेची माहिती देण्यात आली आणि रजाच्या रोखीकरणाची माहिती देण्यात आली आणि त्यामध्ये असेही नमुद केले की श्री डी. बी. अरमरकर यांना बडतर्फ केले असल्यामुळे इतर निवृत्ती विषयक लाभ नियम क्र. 45 अन्वये देय नसल्यामुळे अदा करण्याचा प्रश्न उदभवत नही असे जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगा पुढे सांगितले.

5. अपीलकर्ती तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. 18.3.2011 च्या माहिती अर्जाला अनुसरुन दि. 20.4.2011 आणि दि. 30.8.2011 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्तीचे अपील खारीज करण्यात येत आहे.

6. **<u>अपील क्रमांक 789 नाग/2011</u> —** आजच्या सुनावणीस अपीलकर्ती यांच्या वतीने त्यांचा मुलगा श्री दिलीप अरमरकर यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 5.3.2011 रोजी जन माहिती अधिकारी विभागीय कृषी सहसंचालक कार्यालय नागपूर विभाग नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन श्री डी. बी. अरमरकर यांनी महालेखाकार कार्यालयाकडे आपल्या कार्यालया मार्फत पाठवावयाच्या नमुना नं. 22 ची प्रत त्यांनी मागितलेली होती. सेवानिवृत्ती वेतनासाठी सेवा पडताळणी प्रमाणपत्राचा नमुना 22 हा पाठविला होता की नाही याची माहिती त्यांनी मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून याबाबत दि. 23.3.2011 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. आणि त्यामध्ये असेही नमुद केले की सेवा पुस्तकातील पृष्ठ क्र.47 वर दि. 1.4.1976 च्या वेतन निश्चितीच्या नोंदी लेखाधिकारी, वेतन पडताळणी अधिकारी यांचेमार्फत घेण्यात आलेल्या आहेत. तसेच याबाबतचा वेतन पडताळणी कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार नस्तीला आढळून आलेले नाही. तसेच नमुना 22 प्रमाणे श्री अरमरकर यांची अर्हतकारी सेवा पुर्ण न झाल्याने लेख परिक्षा अधिका—याकडे पाठविण्यात आला नसेल असे वाटते अशी माहिती त्यांना मिळाली. मात्र त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही देखील त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

7. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहा. प्रशासन अधिकारी श्री ए. एन. शेंडे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी श्री आर. बी. चलवदे हे उपस्थित होते.

8. जन माहिती अधिकारी श्री ए. एन. शेंडे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्तीचा दि. 5.3.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्तीने वर नमुद केल्याप्रमाणे श्री डी. बी. अरमरकर यांच्या नमुना 22 ची प्रत मागितलेली होती. त्याला अनुसरुन अपीलकर्तीस जन माहिती अधिकारी यांनी दि. 23.3.2011 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. सदरची दि. 23. 3.2011 च्या पत्राची माहिती अपीलकर्तीस प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र नमुना 22 मध्ये माहिती भरलेली प्रत त्यांना मिळाली नाही असे त्यांनी आयोगा पुढे सांगितले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे सांगितले की अपीलकर्तीस दि. 23.3.2011 च्या पत्राने असे

कळविले की याबाबतचा वेतन पडताळणी कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार नस्तीला आढळून आलेले नाही. तसेच नमुना 22 प्रमाणे श्री अरमरकर यांची अर्हतकारी सेवा पुर्ण न झाल्याने लेख परिक्षा अधिका–याकडे पाठविण्यात आला नसेल असे वाटते अशी वस्तुस्थितीदर्शक माहिती त्यांनी अपीलकर्तीस उपलब्ध करुन दिल्याचे सांगितले.

9. अपीलकर्ती तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस 23.3.2011 च्या पत्राने वस्तुस्थितीदर्शक माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्तीचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्तीचे अपील क्रमांक 788 नाग/2011 व अपील क्रमांक 789 नाग/2011 खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.2228-2230

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 685 नाग/2011**

श्री उदयभान दगडुजी मालाधारी
प्लॉट क्र.44 रोड क्र.10 विश्वकर्मा नगर, मेडीकल कॉलेजच्या मागे नागपूर
ता. जि. नागपूर – 440027 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक(क.व औ.सं.)
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ मुंबई
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतुक भवन, मुंबई सेंट्रल मुंबई 08
2) जन माहिती अधिकारी तथा मुख्य कर्मचारी वर्ग अधिकारी,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ मुंबई
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतुक भवन, मुंबई सेंट्रल मुंबई 08 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.9.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 19.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 12.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत हजर राहण्याचे आदेशित केलेले होते. मात्र सदरच्या दिवशी सुनावणी न होवू शकल्यामुळे प्रस्तुत सुनावणी आज दि. 8.9.2011 रोजी घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 10.2.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्य कर्मचारी वर्ग अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ मुंबई यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन सन 2007–2008 मध्ये सहाय्यक वाहतुक अधिक्षक (कनिष्ठ) आणि वाहतुक निरीक्षक (कनिष्ठ) या पदाच्या भरती बाबत 1 ते 4 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना 30 दिवसात जन माहिती अधिकारी यांचेकडून कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील महाव्यवस्थापक(क.व औ.सं.) यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नाही. आणि निर्णय देखील दिला नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले. द्वितीय अपीलाची सुनावणीची नोटीस प्राप्त झाल्यानंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. 3.8. 2011 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. परंतू सदरची माहिती 5 महिने 23 दिवसाच्या विलंबाने उपलब्ध करुन दिली. म्हणून विलंबाबद्यल जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द कार्यवाही करावी असे त्यांनी आयोगापुढे नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी यांच्या वतीने श्री आंभोरे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने विभाग नियंत्रक नागपूर श्री एच. एस. वाकोडे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांच्या वतीने उपस्थित असलेले श्री आंभोरे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 10.2.2011 चा माहितीचा अर्ज महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ मुंबई यांचेकडे प्राप्त झाला होता. परंतू कार्यबाहुल्यामुळे त्यांना अपीलकर्त्यास 30 दिवसाच्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. तथापी त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 3.8.2011 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. कारण

जन माहिती अधिकारी यांचेकडे कामाची व्याप्ती मोठी असल्यामुळे 30 दिवसाच्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे श्री आंभोरे यांनी आयोगापुढे सांगितले.

5. तसेच त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील महाव्यवस्थापक यांचेकडे दाखल केले. मात्र महाव्यवस्थापकांना देखील कार्यबाहुल्यामुळे प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय देता आला नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने उपस्थित असलेले श्री एच. एस. वाकोडे विभाग नियंत्रक नागपूर यांनी आयोगापुढे सांगितले.

6. वास्तविक पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या दि. 10.2.2011 च्या माहिती अर्जाला अनुसरुन माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 7 (1) अन्वये 30 दिवसाच्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. त्यानंतर दि. 3.8.2011 च्या पत्राने अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. म्हणजे विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. म्हणून विलंबाबद्यल जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येते.
2) जन माहिती अधिकारी तथा मुख्य कर्मचारी वर्ग अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ मुंबई यांनी 30 दिवसाच्या मुदतीत अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) अन्वये रु. 20000/— शास्तीची कार्यवाही का लादण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत आयोगापुढे सादर करावा.
3) प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक(क.व औ.सं.) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ मुंबई यांचेकडे अपीलकर्त्याने दि. 29.3.2011 रोजी प्रथम अपील दाखल केल्यानंतर प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय दिला नाही माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) अन्वये त्यांचेवर सोपविलेली जबाबदारी त्यांनी पार पाडलेली नाही म्हणून त्यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात याबाबतची पुनरावृत्ती करु नये अशी समजही त्यांना देण्यात येत आहे.
4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2232-2233

जा.क.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 898 नाग/2011

श्री इमरान इनायतुल्लाह चिश्ती
हॉटेल अल–जम–जम मागे, आझमशह चौक, मस्जिद जवळ
सेंट्रल एव्हेन्यू रोड नागपूर –2 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सह सचिव
ल–1 कार्यासन, महसूल व वन विभाग,
मंत्रालय मुंबई 32
2) श्री विलास थोरात
जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव
ल–1 कार्यासन, महसूल व वन विभाग,
मंत्रालय मुंबई 32 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 9.9.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.6.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 17.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 9.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 13.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन त्यांनी मा. महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांचेकडे दि. 21.4.2010 रोजी अधिक्षक भूमि अभिलेख नागपूर यांचे विरुध्द तक्रार केलेली होती. त्या तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना 30 दिवसात माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील सह सचिव महसूल व वन विभाग यांचेकडे दाखल केले. आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि. 30.4.2011 रोजी देण्यात आला. आणि त्या निर्णयात असे नमुद केले की जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख महाराष्ट्र राज्य पूणे यांनी अपीलकर्त्याच्या दि. 21.4.2010 च्या अर्जाच्या संदर्भात शासनाच्या दि. 22.12.2010 च्या पत्रान्वये मागविलेला अहवाल शासनास सादर करावा आणि सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर 15 दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी त्यांना

दि. 26.8.2011 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली असे त्यांनी सुनावणीत आयोगापुढे सांगितले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव ल–1 कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई श्री विलास थोरात हे उपस्थित होते. त्यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 13.8.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या विभागात प्राप्त झाला नाही. मात्र अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केल्यानंतर त्यांच्या माहिती अर्जाची बाब माहिती अधिका–याच्या निदर्शनास आली म्हणून प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जात मागितलेल्या माहितीच्या बाबत जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख महाराष्ट्र राज्य पूणे यांच्याकडून अर्जदाराच्या दि. 21.4.2010 च्या अर्जाच्या संदर्भात अहवाल मागितला. सदरचा अहवाल जमाबंदी आयुक्त यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर अपीलकर्त्यास दि. 26.8.2011 च्या पत्राने आवश्यक ती माहिती स्पिड पोस्टाने उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. तसेच त्यांना त्यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन माहिती प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे स्पष्ट केले. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2227-2228

जा.क्र.––––––––– दि.................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 795 नाग/2011**

श्री परमेश्वर शिवशंकर देशमुख
मु. पो. गोबरवाही
ता. तुमसर जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री नारायण जोशी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद भंडारा
ता. जि. भंडारा
2) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका
बुटी विद्यालय खमारी(बुटी) पो. माटोरा
ता. जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 9.9.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 9.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 22. 2.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका बुटी विद्यालय खमारी(बुटी) पो. माटोरा ता. जि. भंडारा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन अपीलकर्ता दि. 1.12.2010 ला बुटी विद्यालय खमारी येथे रुजू झाले तथापी दि. 2.12.2010 पासून त्यांना हजेरीपटावर स्वाक्षरी करु दिली नाही व वेतनही काढले नाही याबाबत त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. 6.4.2011 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी त्या माहितीने अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) यांचेकडे दाखल केले. मात्र त्यांचे प्रथम अपील फेटाळल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांच्या वतीने श्री विलास बाभरे सहा. माहिती अधिकारी हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) श्री जोशी हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांच्या वतीने उपस्थित असलेले श्री विलास बाभरे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 22.2.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 15.3.2011 रोजी प्राप्त झाला होता. आणि अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन दि. 6.4.2011 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र त्यांना अद्यापी वेतन मिळालेले नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) यांचेकडे दाखल केले. आणि शिक्षणाधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयात असे कळविले

की जन माहिती अधिकारी यांनी दि. 6.4.2011 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन पुरविली असल्यामुळे अपील खारीज केलेले आहे असे श्री जोशी शिक्षणाधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याचा दि. 22.2.2011 चा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. 15.3.2011 रोजी प्राप्त झाला होता. माहिती अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 6.4.2011 च्या पत्राने त्यांच्या वेतनाबाबत आवश्यक ती वस्तुस्थितीदर्शक माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळे अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध झाल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2230-2231

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 796 नाग/2011 व अपील क्रमांक 797 नाग/2011**

श्री मो. आरीफ मो. शब्बीर
C/o. अब्दुल कुद्दुस, प्लॉट नं. 266, सिध्दार्थ नगर
टेका, नागपूर 17
ता. जि. नागपूर – 17 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री राजेश क–हाडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त
महानगर पालिका झोन क्र. 9, आसीनगर, टेका, नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री ए. जी. नागदिवे उपविभागीय अभियंता
जन माहिती अधिकारी तथा वार्ड अधिकारी,
महानगर पालिका झोन क्र. 9, आसीनगर, टेका, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 9.9.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.5.2011 रोजी अपील क्रमांक 796 नाग/2011 व अपील क्रमांक 797 नाग/2011 राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन व्दितीय अपीले दाखल केलेली आहेत. दोन्ही व्दितीय अपीलांमध्ये अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी हे एकच असल्यामुळे दोनही अपीलांची एकत्रित सुनावणी घेण्यासाठी अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 9.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता महानगर पालिका झोन क्र. 9 श्री ए. जी. नागदिवे हे उपस्थित आहेत. त्याचप्रमाणे दुसरे जन माहिती अधिकारी श्रीमती माधुरी टेंभरे हया हजर आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त श्री क–हाडे हे उपस्थित आहेत.

3. <u>अपील क्रमांक 796 नाग/2011 व अपील क्रमांक 797 नाग/2011</u> – जन माहिती अधिकारी श्री नागदिवे यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 31.7.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला नाही तसेच दुसरे जन माहिती अधिकारी श्रीमती माधुरी टेंभरे यांनी देखील आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 10.8.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला नाही म्हणून अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. तथापी अपीलकर्त्याने व्दितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केल्यानंतर राज्य माहिती आयोगाकडून या व्दितीय अपीलाच्या सुनावणीची नोटिस प्राप्त झाली. त्या नोटिसी सोबत अपीलकर्त्याचा दि. 31.7.2010 आणि दि. 10.8.2010 चा माहितीचा अर्ज प्राप्त झाला. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविले. त्यानंतर अपीलकर्ता त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाले आणि अपीलकर्त्यास दि. 8.9.2011

रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याबाबत अपीलकर्त्याने आयोगाकडे लेखी पत्र दिलेले आहे. त्या पत्राची प्रत जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर सादर केली.

4. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त श्री राजेश क–हाडे यांनी देखील आयोगाच्या निदर्शनास आणून दिले की प्रस्तुत दोन्ही प्रकरणात अपीलकर्त्याने त्यांचेकडे कोणत्याही प्रकारचे प्रथम अपील दाखल केलेले नाही म्हणून प्रथम अपीलाचा निर्णय देणे शक्य झाले नाही. तथापी आयोगाकडील द्वितीय अपीलाच्या सुनावणीची नोटिस प्राप्त झाल्यानंतर अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे प्राप्त झाला त्याला अनुसरुन दोन्ही जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 8.9.2011 रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील आयोगापुढे सांगितले.

5. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याचा दि. 31.7.2010 आणि दि. 10.8.2010 चा माहितीचा अर्ज आणि दि. 14.9.2010 चा प्रथम अपीलाचा अर्ज जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्राप्त झालेले नाही. मात्र आयोगाकडील द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या नोटिसी सोबत अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे प्राप्त झाला आणि त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 8.9.2011 रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. आणि सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याबाबतची पोच जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सादर केल्यामुळे अपीलकर्ता यांचे दोन्ही अपीले खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांची दोन्ही अपीले खारीज करण्यात येतात.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2231-2232

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 803 नाग/2011**

श्रीमती सावित्रीबाई भारके
शिवमंदीर हनुमान मंदिरच्या मागे, शारदा चौक
जलालपुरा, गांधीाग नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एम. एल. गुर्जर पोलीस उपायुक्त
प्रथम अपीलीय अधिकारी
पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री एस. एस. कुदरे सहा. पोलीस आयुक्त(प्रशा.)
जन माहिती अधिकारी
पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर
3) जन माहिती अधिकारी
पोलीस अधिक्षक, नागपूर जिल्हा(ग्रामीण) कार्यालय नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.9.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक 20.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 11.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 12.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ती व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ती यांच्या वतीने श्री मोहनसिंह चौहान यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 19.4.2011 रोजी जन माहिती अधिकारी पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन मौजा शंकरपूर ग्रामपंचायत वेळा मधील ख. क्र. 87/89 व 92 प.ह.42 मधील 137 प्लॉटचे रजिस्टरी नुसार मालकी हक्क, गैर अर्जदाराद्वारे प्लॉटधारकाची फसवणुक व गुंडगीरी व शस्त्राचा धाक दाखवुन गैर अर्जदाराद्वारे सदरच्या प्लॉटधारकाच्या जागेवर अतिक्रमण करुन पुन्हा त्याच जागेवरील प्लॉटची पुनरविक्री करुन फसवणुकीचे व गुंडगीरीचे गुन्हे वारंवार करणेबाबत त्यांनी दि. 7.2.2011 रोजी तक्रार अर्ज दिला होता. त्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापि त्यांना कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त श्री कुदरे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त श्री गुर्जर हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री कुदरे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्तीचा दि. 19.3.2011 चा माहितीचा अर्ज यांच्या कार्यालयाकडे दि. 23.3.2011 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्तीने मागितलेली माहिती ही पोलीस स्टेशन हिंगणा हद्यीतील असल्यामुळे सदरचा तक्रार अर्ज यापुर्वीच दि. 9.2.2011 रोजी त्यांनी पोलीस अधिक्षक, नागपूर जिल्हा(ग्रामीण) नागपूर यांचेकडे पाठविला होता आणि त्याप्रमाणे अपीलकर्त्याच्या माहिती अधिकाराच्या अर्जाला

अनुसरुन दि. 29.3.2011 रोजी अपीलकर्त्यास कळविण्यात आले की आपण मागितलेली माहिती ही पोलीस अधिक्षक, नागपूर यांचेशी संबंधीत असल्यामुळे त्यांचेकडे नव्याने अर्ज सादर करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी. या निर्णयाने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील पोलीस उपायुक्त पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपील त्यांचे खारीज करण्यात आले असे श्री गुर्जर यांनी आयोगा पुढे सांगितले.

5. मात्र प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की पोलीस अधिक्षक ग्रामीण आणि पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर या दोन्ही कार्यालयाच्या संबंधात त्यांनी मागणी केलेली माहिती निगडीत आहे म्हणून त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जात मागितलेल्या माहितीचे स्थळ हे पोलीस अधिक्षक ग्रामीण यांच्या अधिकार क्षेत्रात येत असल्याने सदरच्या अर्जावर कार्यवाही पोलीस अधिक्षक ग्रामीण यांच्याकडून करणे अपेक्षित आहे.

6. म्हणून अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की या प्रकरणात प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर यांनी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात पोलीस अधिक्षक ग्रामीण नागपूर यांनी काय कार्यवाही केलेली आहे याची माहिती पोलीस उपायुक्त यांनी त्यांच्याकडून प्राप्त करुन घेवून अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त नागपूर यांनी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात पोलीस अधिक्षक ग्रामीण नागपूर यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांच्याकडून प्राप्त करुन घेवून अपीलकर्त्यास विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2234-2235

जा.क्र.————————— दि.................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 804 नाग/2011**

श्री प्रकाश आत्माराम ठवरे
पाताळेश्वर रोड पाध्ये भवन जवळ
महाल नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर
2) सौ एस. एस. टांकसाळे
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक (राजस्व शाखा)
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर
3) श्री जी. एन. खैरकर नायब तहसिलदार
जन माहिती अधिकारी
तहसिलदार नागपूर (ग्रामीण) कार्यालय नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.9.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 11.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 12.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 19.3.2011 रोजी जन माहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन त्यांनी दि. 2.2.2011 च्या अर्जा सोबत पाठविलेल्या 134 सहत्राचे अवलोकन होवून त्यावर केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात 1 ते 8 मुद्यांची माहिती त्यांनी मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांच्या अपेक्षेप्रमाणे माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उप जिल्हाधिकारी (महसूल) यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपील त्यांचे खारीज केल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक (राजस्व शाखा) सौ एस. एस. टांकसाळे हया उपस्थित होत्या. तसेच जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार नागपूर (ग्रामीण) श्री जी. एन. खैरकर हे उपस्थित होते. आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी (महसूल) श्री मिलिंद कुमार साळवे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी सौ एस. एस. टांकसाळे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 19.3.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 7.4.2011 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती तहसिलदार नागपूर (ग्रामीण) यांचेशी संबंधीत असल्यामुळे सदरचा माहितीचा अर्ज तहसिलदार नागपूर (ग्रामीण) यांचेकडे दि. 7.4.2011 रोजी कार्यवाहीसाठी पाठविला आणि त्याची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देवून तहसिलदार नागपूर (ग्रामीण) यांचेशी संपर्क साधण्यासाठी कळविले.

5. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी नायब तहसिलदार नागपूर (ग्रामीण) यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत त्यांच्या कार्यालयास दि. 13.4.2011 रोजी प्राप्त झाला होता. तथापी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत नसल्यामुळे आणि फौजदारी स्वरुपाची कार्यवाही सदृश्य त्यांनी माहिती मागितल्यामुळे अपीलकर्त्याने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत नाही म्हणून अपीलकर्त्यास दि. 9.5.2011 च्या पत्राने कळविले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उप जिल्हाधिकारी (महसूल) नागपूर यांचेकडे यांचेकडे दाखल केले. आणि प्रथम अपीलाची सुनावणी दि. 7.6.2011 रोजी घेण्यात आली आणि प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळी असे दिसून आले की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही महसूल विभागाशी संबंधित नसून दुय्यम निबंधक कार्यालयाशी संबंधीत असल्याचे दिसून येते. तसेच सदर प्रकरण फौजदारी स्वरुपाचे असल्याने अपीलकर्त्याने पोलीस विभागाकडे तक्रार करावी जेणेकरुन या प्रकरणी त्यांना न्याय मिळू शकेल असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी अपीलकर्त्यास सांगितले आणि त्याप्रमाणे प्रथम अपीलाच्या निर्णयात ही बाब नमुद करुन प्रथम अपील खारीज केल्याचे श्री मिलिंद कुमार साळवे उप जिल्हाधिकारी (महसूल) यांनी आयोगापुढे सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही दुय्यम निबंधक कार्यालयाशी संबंधीत असल्याने तसेच फौजदारी स्वरुपाची कार्यवाही असल्याने त्यांनी पोलीस विभागाकडे तक्रार करणे योग्य होईल म्हणून प्रथम अपीलाच्या निर्णयात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी ही बाब स्पष्ट केली असल्याने प्रथम अपीलाचा निर्णय कायम करण्यात येत आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2237-2238

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 802 नाग/2011**

श्री श्रीकांत बनमाली शाहू
412–बी, विदर्भ कमर्शियल कॉम्प्लेक्स
संगम टॉकीज, सक्करदरा, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
विषेश पोलीस महानिरीक्षक कार्यालय नागपूर परिक्षेत्र नगपूर
ता. जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी
विषेश पोलीस महानिरीक्षक कार्यालय नागपूर परिक्षेत्र नगपूर
3) श्री एल. एन. कांबळे कार्यालय अधिक्षक
जन माहिती अधिकारी
पोलीस अधिक्षक, नागपूर जिल्हा(ग्रामीण) कार्यालय नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.9.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 11.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 12.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 19.3.2011 रोजी जन माहिती अधिकारी विषेश पोलीस महानिरीक्षक कार्यालय नागपूर परिक्षेत्र नगपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन त्यांनी दि. 2.2.2011 च्या अर्जा सोबत पाठविलेल्या 134 सहपत्राचे अवलोकन होवून त्याबाबत 8 मुद्यांची माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना अपेक्षेप्रमाणे माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक विषेश पोलीस महानिरीक्षक कार्यालय नागपूर श्री एल. एन. कांबळे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या तर्फे श्री अशोक अंबादासजी पराते हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री कांबळे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 19.3.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 21.3.2011 रोजी प्राप्त झाला होता. तथापी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही पोलीस अधिक्षक, नागपूर जिल्हा(ग्रामीण) यांचेशी संबंधीत असल्याने अपीलकर्त्याचा अर्ज दि. 23.3.2011 रोजी पोलीस अधिक्षक, नागपूर जिल्हा(ग्रामीण) यांचेकडे पाठविण्यात आला. आणि अपीलकर्त्यास मुदतीत माहिती सादर करण्याबाबत कळविले व त्याची प्रत अपीलकर्त्यास देण्यात आली. त्याला अनुसरुन पोलीस उप अधिक्षक, नागपूर जिल्हा(ग्रामीण) नागपूर यांनी अपीलकर्त्यास दि. 1.4.2011 रोजी असे कळविले की आपण मागितलेली

माहिती त्यांच्या कार्यालयाचे अभिलेखावर उपलब्ध नसून त्यांच्या अधिकार क्षेत्रात ही माहिती नसल्याने पुरविता येणे शक्य नाही करीता आपण संबंधीत सोसायटी तसेच दुय्यम निबंधक कार्यालय यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील विषेश पोलीस महानिरीक्षक नागपूर कार्यालयाकडे दाखल केले. तथापी अपीलकर्त्यास दि. 3.5.2011 रोजी असे कळविले की या प्रकरणात प्रथम अपीलीय अधिकारी पोलीस अधिक्षक, नागपूर जिल्हा(ग्रामीण) हे असल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल करावे. तथापी अपीलकर्त्याने प्रथम अपील पोलीस अधिक्षक, नागपूर जिल्हा(ग्रामीण) यांच्या कार्यालयाकडे दाखल केलेले नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. 1.4. 2011 च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती बाबत आवश्यक ती वस्तुस्थिती कळविलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांनी संबंधित कार्यालयाशी संपर्क साधणे योग्य होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2237-2238

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 805 नाग/2011**

सौ. सुषमा मोहनसिंग चौव्हान
प्लॉट नं. डी–4, शिवम अपार्टमेंट रुईकोर रोड
महाल, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा. संचालक(नगर रचना)
नागपूर सुधार प्रन्यास नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री एस. बी. झाडे
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(नगर रचना)
नागपूर सुधार प्रन्यास कार्यालय नागपूर
3) श्री जी. आर. कंकाळे
जन माहिती अधिकारी
पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन हिंगणा
ता. हिंगणा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.9.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक 16.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 11.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 12.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ती व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ती यांच्या वतीने श्री मोहनसिंग चौव्हान यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 19.3.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता नागपूर सुधार प्रन्यास नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन मौजा शंकरपूर ग्रा. पं. वेळा मधील ख.ग.क्र.87, 89 व 92 प.ह.नं.42 मधील 137 प्लॉटच्या संबंधी त्यांनी दि. 2.2.2011 च्या अर्जासोबत पाठविलेल्या 134 सहपत्राच्या बाबत 1 ते 8 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना त्यांना अपेक्षेप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीला नंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी नागपूर सुधार प्रन्यास नागपूर श्री झाडे हे उपस्थित होते. तसेच दुसरे जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन हिंगणा श्री जी. आर. कंकाळे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्तीचा दि. 19.3.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 22.3.2011 रोजी प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी नागपूर सुधार प्रन्यास नागपूर यांनी अपीलकर्तीस दि. 31.3.2011 च्या पत्राने असे कळविले की आपण माहितीच्या अर्जात 8 मुद्यांची माहिती अपेक्षिलेली असून मौजा शंकरपूर ख. क्र.87, 89 व 92 प.ह.नं.42 या प्रकरणाची धारीका अथवा दस्तऐवज या कार्यालयाच्या अभिलेखात उपलब्ध नाही तसेच मुद्येनिहाय माहिती मध्ये अपेक्षिलेली माहिती ही फौजदारी स्वरुपाची व मालकी दस्तऐवज संदर्भाची असल्याने त्यांच्या कार्यालयाशी निगडीत नाही त्यामुळे आपला मुळ अर्ज पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन हिंगणा यांचेकडे पाठविण्यात येत आहे. त्यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे जन माहिती अधिकारी नागपूर सुधार प्रन्यास नागपूर यांनी अपीलकर्तीस कळविल्याचे त्यांनी सुनावणीत सांगितले.

5. त्यानंतर अपीलकर्तीने प्रथम अपील सहा. संचालक(नगर रचना) यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 7.5.2011 रोजी घेण्यात आली आणि सुनावणी नंतर प्रथम अपीलाचा निर्णय दि. 16.5.2011 रोजी देण्यात आला. आणि प्रथम अपीलाच्या निर्णयात असे नमुद केले की अनधिकृत विक्रीपत्र करुन अवैध कब्जा करणे, शस्त्राचा धाक दाखवून गुंडगिरी करणे, धमकी देवून रकमा स्वीकृत करणे इत्यादी बाबी फौजदारी स्वरुपाच्या असून त्याचा संबंध नागपूर सुधार प्रन्यासशी येत नाही. या संदर्भात अर्जदाराने फौजदारी गुन्हा पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन हिंगणा यांचेकडे दाखल करणे क्रमप्राप्त ठरते असे नमुद करुन प्रथम अपीलअ निकाली काढल्याचे जन माहिती अधिकारी नागपूर सुधार प्रन्यास नागपूर यांनी आयोगापुढे सांगितले.

6. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन हिंगणा यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्तीचा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी नागपूर सुधार प्रन्यास यांच्याकडून प्राप्त झाला होता. त्याबाबत पोलीस स्टेशन हिंगणाशी संबंधीत असलेल्या मुद्यांची माहिती अपीलकर्तीस दि. 23.8. 2011 च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती अपीलकर्तीस प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे सुनावणीत मान्य केले. मात्र सदरची माहिती अपुर्ण असल्याचे त्यांनी सुनावणीत सांगितले. सदरच्या माहिती मध्ये भारतीय दंड विधानाच्या गुन्हयाबाबतची कलमे योग्य लावलेली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन हिंगणा यांनी आयोगा पुढे असे सांगितले की प्रस्तुत प्रकरणात अपराध क्रमांक 246/2008 कलम 420, 294, 506, 34 भा. द. वि. प्रमाणे गुन्हा नोंद असून न्यायप्रविष्ट आहे असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

7. अपीलकर्ती तसेच जन माहिती अधिकारी आणि पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन हिंगणा यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्तीस त्यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी नागपूर सुधार प्रन्यास आणि पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन हिंगणा यांनी वर नमुद केल्याप्रमाणे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत माहिती त्यांनी अपीलकर्तीस उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्ती यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ती यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2241-2243

जा.क्र.———————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 817 नाग/2011**

श्री दिलीपकुमार फनिन्द्रनाथ कटरे
मु. पो. मोहगाव(बुझ)
ता. गोरेगाव जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
स्वामी विवेकानंद विद्यालय कारंजा
पो. कारंजा ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.9.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 11.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 13.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हजर आहेत. मात्र जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद गोंदिया यांच्या तर्फे श्री अे. बी. चौधरी हे हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 8.2.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक स्वामी विवेकानंद विद्यालय कारंजा पो. कारंजा ता. जि. गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन अपीलकर्ता यांची संस्थेने सहा. शिक्षक (अप्रशिक्षित) अस्थायी पदावर नियुक्ती केलेल्या आदेशाची प्रत आणि सन 2001 ते 2005 या कालावधीत अस्थायी अप्रशिक्षित पदावर नियुक्ती केलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा–यांची यादीची प्रत आणि त्यांना दिलेल्या मानधाबाबतची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि. 18.4.2011 रोजी देण्यात आला त्या निर्णयात जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापकानी अपीलकर्ता यांना तात्काळ माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिला. तथापी त्यानंतरही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक स्वामी विवेकानंद विद्यालय कारंजा हे गैरहजर आहेत. तथापी आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांच्या वतीने श्री ए. बी. चौधरी हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील दाखल झाले होते. त्या प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि सुनावणी नंतर प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला आणि प्रथम अपीलाच्या निर्णयात अपीलकर्त्यास मुख्याध्यापकानी तात्काळ माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविले. तथापी

अपीलकर्त्यास प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही माहिती मिळाली नाही असे अपीलकर्त्याने आयोगापुढे नमुद केले

4. अपीलकर्ता तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने उपस्थित असलेले श्री ए. बी. चौधरी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 8.2. 2011 च्या माहिती अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक स्वामी विवेकानंद विद्यालय कारंजा पो. कारंजा ता. जि. गोंदिया यांनी अपीलकर्त्यास 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध होण्यास विलंब झालेला आहे आणि सदरच्या विलंबास जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हे जबाबदार दिसून येतात. म्हणून विलंबाबद्यल त्यांच्यावर माहितीच्या अधिकाराखाली कार्यवाही करणे आवश्यक असल्याने अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत आहे.
2) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक स्वामी विवेकानंद कारंजा पो. कारंजा ता. जि. गोंदिया यांनी अपीलकर्त्याच्या दि. 8.2.2011 च्या माहिती अर्जाला अनुसरुन मागितलेली माहिती हा आदेश मिळाल्यापासून 15 दिवसात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.
3) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलकर्त्याच्या दि. 8.2.2011 च्या माहिती अर्जाला अनुसरुन 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही माहिती उपलब्ध झालेली दिसून येत नाही म्हणून विलंबाबद्यल जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) अन्वये शास्तीची कार्यवाही कां लादण्यात येवू नये याचा लेखी खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत आयोगाकडे सादर करावा.
4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2245-2246

जा.क्र.————————— दि.................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 811 नाग/2011

श्री आनंद अजाबराव धानोरकर
तुकाराम सभागृह चौक धाडीवाल ले–आऊट
बौध्द विहाराजवळ रिंग रोड नागपूर – 27 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्राचार्य
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रविनगर, नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्रीमती बुराडे जेष्ठ अधिव्याख्याता
जन माहिती अधिकारी
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रविनगर, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.9.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये व्दितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 11.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 13.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 11.4.2011 रोजी जन माहिती अधिकारी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रविनगर, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन डी.एड.परीक्षे संदर्भात 1 ते 4 मुद्यांवर त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 10.5.2011 च्या पत्राने माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविण्यात आले. त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ते माहितीचे शुल्क भरण्यासाठी उपस्थित झाले परंतू माहितीच्या शुल्काची रक्कम त्यांनी स्वीकृत केली नाही किंवा माहितीच्या शुल्काचे चालान पास करुन दिले नाही म्हणून ते माहितीचे शुल्क भरणा करु शकले नाही व त्यांना माहिती देखील उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नागपूर यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नागपूर श्रीमती बुराडे जेष्ठ अधिव्याख्याता हया उपस्थित होत्या. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन त्यांनी अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती काढण्यात आली आणि अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क भरण्याबाबत दि. 10.5.2011 रोजी पत्र पाठविले. तथापी अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरले नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे सांगितले. तथापी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती आता देखील त्यांच्या जवळ उपलब्ध असून ती माहिती विनामुल्य अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आयोगा समोर विनामुल्य माहिती उपलब्ध करुन दिली आणि सदरची माहिती अपीलकर्त्याने आयोगा समोर स्वीकृत केली.

4. अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन आवश्यक असलेली माहिती विनामुल्य जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

Ageyord6.2248-2249

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 819 नाग/2011**

श्री गजानन वामनराव ढाकूलकर
मु. सुरज नगर प्लॉट नं. 41 रायपूर
पो. ता. हिंगणा जि. नागपूर –441110 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. बी. राजवाडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी
कृषी कार्यालय हिंगणा
ता. हिंगणा जि. नागपूर –441110
2) सौ. जांभूळकर कृषी अधिकारी
जन माहिती अधिकारी
तालुका कृषी अधिकारी कार्यालय हिंगणा
ता. हिंगणा जि. नागपूर –441110 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 14.9.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 11.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 14.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 9.2.2011 रोजी जन माहिती अधिकारी तालुका कृषी अधिकारी कार्यालय हिंगणा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन हिंगणा तालुक्यातील शेतकरी अपघात विमा योजना संदर्भात 1 ते 5 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून 30 दिवसात कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील तालुका कृषी अधिकारी हिंगणा यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय दिलेला नाही आणि त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी सौ. जांभूळकर हया उपस्थित होत्या. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी श्री राजवाडे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी सौ. जांभूळकर यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 9.2.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 10.2.2011 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने शेतकरी अपघात विमा योजना संदर्भात माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अपीलकर्त्यास दि. 24.2.2011 रोजी माहितीचे शुल्क रु. 908/– भरण्याबाबत कळविले. मात्र सदरच्या पत्रावर नजरचुकीने दि. 24.2.2010 अशी तारीखी टाकण्यात आलेली आहे म्हणून सदरच्या पत्रातील तारीख ही दि. 24.2.2010 च्या ऐवजी दि. 24.2. 2011 आहे असे त्यांनी आयोगापुढे नमुद केले. तथापी जन माहिती अधिकारी यांनी दि. दि. 24.2.2011 च्या पत्राने माहितीचे शुल्क भरण्याबाबतचे पत्र अपीलकर्त्यास दि. 25.4. 2011 रोजी प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे सांगितले. आणि सदरचे पत्र पोस्टाद्वारे प्राप्त झाले असल्यामुळे त्या पोस्टाच्या पाकीटावर दि. 25.4.2011 असा पोस्टाचा शिक्का त्यांनी आयोगापुढे दाखविला. म्हणून माहितीचे शुल्क भरण्याबाबतचे पत्र हे अपीलकर्त्यास उशिरा प्राप्त झाल्यामुळे त्यांना विनामुल्य माहिती मिळावी असे अपीलकर्त्याने सांगितले.

5. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील तालुका कृषी अधिकारी हिंगणा यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी कार्यबाहुल्यामुळे घेता आली नाही असे तालुका कृषी अधिकारी श्री राजवाडे यांनी आयोगापुढे सांगितले. कारण या कालावधीत त्यांच्या तालुक्यामध्ये नैसर्गिक आपत्ती अंतर्गत शेतक–यांना अनुदान वाटपाच्या कामाचा व्याप मोठा होता म्हणून प्रथम अपीलाची सुनावणी त्यांनी घेतली नाही असे नमुद केले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 9.2. 2011 च्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 24.2.2011 च्या पत्राने माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविले होते. तथापी सदरचे पत्र अपीलकर्त्यास दि. 25.4.2011 रोजी प्राप्त झाल्याचे दिसून आल्यामुळे अपीलकर्त्यास आता जन माहिती अधिकारी यांनी विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. तसेच प्रस्तूत प्रकरणी अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी मागितलेल्या माहिती मध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहितीचे पाने 454 कळविलेले आहे. तथापी त्यांना इतक्या पानांची आवश्यकता नाही त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात जी माहिती पाहिजे आहे तेवढीच माहिती त्यांना उपलब्ध झाल्यास त्यांची हरकत नाही असे त्यांनी आयोगापुढे स्पष्ट केले. म्हणून प्रस्तूत प्रकरणात अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हजर राहून त्यांनी मागितलेल्या माहितीच्या कागदपत्रांचे निरीक्षण करुन घेवून निरीक्षणाअंती त्यांना पाहिजे असलेली माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी दि. 16.9.2011 रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत हजर राहून त्यांना पाहिजे असलेल्या माहितीच्या कागदपत्रांचे निरीक्षण करुन घ्यावे आणि निरीक्षणाअंती त्यांना पाहिजे असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.
2) प्रस्तूत प्रकरणात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय दिलेल नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) अन्वये त्यांच्यावर सोपविलेली जबाबदारी त्यांनी पार पाडलेली नाही म्हणून म्हणून त्यांना सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात त्यांनी याबाबतची पुनरावृत्ती करु नये अशी समज त्यांना देण्यात येत आहे.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2248-2250

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 904 नाग/2011

श्री हेमंत रामभाऊ शेंबेकर
मु. पो. नरखेड वार्ड क्र 1 अमृत नगर
ता. नरखेड जि. नागपूर – 441304 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. व्ही. राठोड
प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसंचालक
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर
2) सौ कविता बुटले
जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक
यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 14.9.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.6.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 18.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 14.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 26.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन कनिष्ठ लिपीक तथा भांडार लिपीक या पदाची कार्यप्रणाली तसेच पदोन्नती आणि भरतीच्या नियमाबाबत माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 28.12.2010 च्या पत्राने माहिती प्राप्त झाली. मात्र त्या माहितीने अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील सहसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांचेकडे दाखल केले. मात्र त्यांचे प्रथम अपील खारजी केल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय नागपूर सौ कविता बुटले हया उपस्थित होत्या. तसेच प्रथम

अपीलीय अधिकारी तथा सहसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण श्री एस. व्ही. राठोड हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी सौ कविता बुटले यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 26.11.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 30.11.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने सदरच्या अर्जात कनिष्ठ लिपीक तथा भांडार लिपीक या पदाची कार्यप्रणाली तसेच पदोन्नती आणि भरतीच्या नियमाबाबत माहिती मागितलेली होती. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 14. 12.2010 च्या पत्राने माहितीचे व पोस्टाचे शुल्क रु. 27/— भरण्याबाबत कळविण्यात आले. त्यानुसार अपीलकर्त्याने दि. 22.12.2010 रोजी माहितीचे शुल्क भरणा केले. म्हणून अपीलकर्त्यास दि. 28.12.2010 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली आणि त्यामध्ये असे नमुद केले की कनिष्ठ लिपीक तथा भांडार लिपीक हे पद दि. 30. 9.2006 च्या आढाव्याअंती निर्माण झालेले आहे. या पदाच्या प्रस्तावित सेवा शतीच्या आधारे सदर पदाची जाहिरात सन 2008 मध्ये देण्यात आली होती त्याची प्रत सोबत जोडलेली आहे तसेच सदर पद नवनिर्मित असल्याने या व्यतिरिक्त माहिती या कार्यालयाकडे उपलब्ध नाही तसेच या विभागातील एकुण 19 संस्थेमध्ये दि. 30.9.2006 च्या आढाव्यानुसार सदर पद निर्माण करण्यात आलेले आहे आणि या आस्थापनेवर कनिष्ठ लिपीक तथा भांडार लिपीक या पदाकरीता एकस्तर पदोन्नती बाबत शासन निर्णय उपलब्ध नाही अशी माहिती अपीलकर्त्यास माहिती अर्जाला अनुसरुन उपलब्ध करुन दिल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील सहसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 2.2.2011 रोजी ठेवण्यात आली होती. तथापी अपीलकर्ता प्रथम अपीलाच्या सुनावणीस गैरहजर राहिले म्हणून जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेवून दि. 17.2.2011 रोजी प्रथम अपीलाचा निर्णय निर्गमित करण्यात आल्याचे श्री राठोड यांनी आयोगापुढे सांगितले. आणि प्रथम अपीलाच्या निर्णयात देखील पुन्हा अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीच्या संदर्भात विश्लेषण करुन माहिती पुरविल्याचे श्री राठोड यांनी आयोगापुढे सांगितले.

5. जन माहिती अधिकारी यांच्या कडील दि. 28.12.2010 च्या पत्राने पाठविलेली माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे सुनावणीत मान्य केले. मात्र सदर पदानंतर पदोन्नती कोणत्या पदावर अनुज्ञेय आहे या पदाच्या कार्यप्रणाली बाबतची माहिती त्यांना मिळाली नाही तथापी याबाबत जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे स्पष्ट केले की कनिष्ठ लिपीक तथा भांडार लिपीक हे पद नव्याने निर्माण झाले असल्यामुळे कामाच्या स्वरुपाबाबत कार्यप्रणाली विहित नाही आणि भविष्यात या पदास कोणत्या पदावर पदोन्नती अनुज्ञेय होईल याबाबत वरिष्ठ कार्यालयाकडून मार्गदर्शन मागविण्यात येईल अशी माहिती अपीलकर्त्यास पुरविली असल्याचे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. 26.11.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि. 28.12.2010 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच प्रथम अपीलाच्या निकालात देखील अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे विश्लेषण दिलेले आहे म्हणून अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध झाल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2250-2252

जा.क्र.————————— दि.................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 818 नाग/2011**

श्री ॲड. राम दिगांबर खोब्रागडे
सौभाग्य जयस्वाल मंगल कार्यालयाजवळ,
34 जुना सुभेदार ले–आऊट मानेवाडा रोड नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक
महिला आर्थिक विकास महामंडळ मुंबई
गृह निर्माण भवन(म्हाडा) पोटमाळा, कलानगर
बान्द्रा(पुर्व) मुंबई 51
2) श्री महेन्द्र गमरे व्यवस्थापक
जन माहिती अधिकारी
महिला आर्थिक विकास महामंडळ मुंबई
गृह निर्माण भवन(म्हाडा) पोटमाळा, कलानगर
बान्द्रा(पुर्व) मुंबई 51 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 14.9.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 11.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 14.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 18.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी महिला आर्थिक विकास महामंडळ मुंबई यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन जिल्हा समन्वय अधिकारी पदाच्या संदर्भात 1 ते 6 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून मुद्या क्र. 1,3,4,5 आणि 6 ची माहिती उपलब्ध झाली मात्र मुद्या क्र. 2 ची माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील व्यवस्थापकीय संचालक महिला आर्थिक विकास महामंडळ मुंबई यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी श्री महेन्द्र गमरे व्यवस्थापक हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा यांच्या वतीने श्री सदानंद कलाल हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री महेन्द्र गमरे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 18.11.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 25.11.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जात जिल्हा समन्वय अधिकारी पदाच्या संदर्भात 1 ते 6 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली. आणि अपीलकर्त्यास दि. 13.12.2010 रोजी माहितीचे शुल्क भरण्याचे पत्र दिले त्याला अनुसरुन अपीलकर्त्याने दि. 27.12.2010 रोजी माहितीच्या शुल्क भरणा केला आणि अपीलकर्त्यास दि. 3.1.2011 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील

व्यवस्थापकीय संचालक महिला आर्थिक विकास महामंडळ मुंबई यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली प्रथम अपीलाच्या निर्णयाला अनुसरुन पुन्हा अपीलकर्त्यास दि. 17. 2.2011 रोजी रजिस्टर पोस्टाद्वारे माहिती पाठविण्यात आली असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 3.1.2011 आणि दि. 17.2. 2011 च्या पत्राने पाठविलेली माहिती प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे सुनावणीत मान्य केले. मात्र त्यांना अद्यापपर्यंत रोस्टरच्या संदर्भात माहिती प्राप्त झालेली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यावर जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की महिला आर्थिक विकास महामंडळातील कर्मचा–याच्या बाबत रोस्टर तयार केलेले नाही. सदरचे रोस्टर तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे रोस्टरची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देता आली नाही. म्हणून अपीलकर्त्यास रोस्टर बाबतची वस्तुस्थिती कळविणे योग्य होईल. त्यासाठी अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या कर्मचा–याचे रोस्टर अद्याप तयार झालेले नाही ती कार्यवाही चालू आहे असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास विनामुल्य व्यक्तीशः रजिस्टर पोस्टाने कळवावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2254-2255

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 826 नाग/2011**

श्री सदानंद श्रावणजी गणवीर
अंबिका नगर यवतमाळ
ता. जि. यवतमाळ –445001 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर प्रधान मुख्यवनसंरक्षक
(मानव संसाधन व्यवस्थापन व प्रशासन) वन भवन, सिव्हील लाईन्स, नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री एस. डी. अत्रे
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,– 10
प्रधान मुख्यवनसंरक्षक वन भवन, सिव्हील लाईन्स, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.9.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 26.10.201 रोजी राज्य माहिती आयोग अमरावती यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले होते. तथापी मा. मुख्य माहिती आयुक्त यांचेकडील दि. 6 मे 2011 च्या आदेशानुसार प्रस्तुत अपीलाची सुनावणी राज्य माहिती आयुक्त नागपूरकडे घेण्याबाबत कळविण्यात आले. त्याला अनुसरुन राज्य माहिती आयुक्त कार्यालयातून प्रस्तुत अपीलाच्या सुनावणीकरीता अपीलकर्ता व उत्तरवादी यांना दि. 16.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 15.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 30.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, 10 प्रधान मुख्यवनसंरक्षक वन भवन, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन महाराष्ट्र राज्य वन कर्मचारी कल्याण निधीच्या संदर्भात 1 ते 4 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना 1 ते 3 मुद्यांची माहिती मिळाली. मात्र मुद्या क्र. 4 ची माहिती त्यांना मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील मुख्यवनसंरक्षक (मानव संसाधन व्यवस्थापन व प्रशासन) वन भवन, सिव्हील लाईन्स, नागपूर यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी घेवून प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी श्री अत्रे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने श्री एस. जी. टेंभूर्णीकर मुख्यवनसंरक्षक हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री अत्रे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 30.6.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 6.7.2010 रोजी प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास 1 ते 3 मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे सुनावणीत मान्य केले. मात्र मुद्या क्र. 4 ची माहिती त्यांना त्यांच्या अपेक्षेप्रमाणे मिळाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याच्या दि. 30.6.2010 च्या माहिती अर्जामधील मुद्या क्र. 4 च्या माहितीच्या संदर्भात अपीलकर्त्यास दि. 13.7.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली आणि त्यामध्ये असे नमुद केले की दिंडाळा रोपवनाच्या कामात झालेल्या भ्रष्टाचाराबाबत तत्कालीन वन परिक्षेत्र अधिकारी उमरेखेड श्री आर. के. चव्हाण तसेच संबंधित वनपाल श्री जे. बी. हटकर व वनसंरक्षक श्री ए. एस. देशमुख यांचेवर मुख्यवनसंरक्षक (प्रादेशिक) यवतमाळ यांनी केंलेल्या कार्यवाहीची वस्तुस्थिती मा. प्रधान मुख्यवनसंरक्षक (Head of Forest Force) महाराष्ट्र राज्य नागपूर यांना या कार्यालयाची टिपणी दि. 30.6.2010 अन्वये सादर केलेले असून सद्यस्थितीतील वस्तुस्थिती पुनश्च आपणास कळविण्या बाबत मुख्यवनसंरक्षक यवतमाळ यांना कळविण्यात आलेले आहे अशी माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यावर अपीलकर्ता यांनी आयोगा पुढे असे सांगितले की दि. 13.7.2010 चे पत्र त्यांना प्राप्त झालेले आहे मात्र श्री चव्हाण यांच्या संदर्भात केंलेल्या कार्यवाहीची माहिती अद्याप मिळाली नाही. म्हणून याबाबत जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की आता प्रस्तुत प्रकरणात कार्यवाही सुरु झालेली आहे. म्हणून सदरच्या विभागीय चौकशीची कागदपत्रे अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणातील विभागीय चौकशीच्या संदर्भातील कागदपत्रे अपीलकर्त्यास विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.
2) प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेवून

प्रथम अपीलाचा निर्णयही दिलेला नाही माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) अन्वये त्यांच्यावर सोपविलेली जबाबदारी त्यांनी पार पाडलेली नाही म्हणून त्यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात याबाबतची पुनरावृत्ती करु नये अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2257-2259

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 744 नाग/2011**

श्री सुरेश परशराम गाडगे
सारथी मार्ग क्र.5 प्लॉट नं. 5 विश्वकर्मा नगर नागपूर
ता. जि. नागपूर –27 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री जी. पी. नांदुरकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी,(कृषि)
पंचायत समिती कार्यालय सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर
2) श्री डी. एम. बोंडे
जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी
ग्राम पंचायत केळवद
ता. सावनेर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.9.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 22.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 25.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. त्या दिवशी सुनावणी झाली नाही म्हणून सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दि. 15.9.2011 रोजी घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 9.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी ग्राम पंचायत केळवद यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन घर क्र. 1881 आणि घर क्र. 1482 संदर्भात फेरफारा बाबत कागदपत्रे मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून कागदपत्रे मिळाली मात्र मिळालेल्या कागदपत्रांमध्ये फेरफारा ज्या कागदपत्रांच्या आधारे घेण्यात आलेले आहे. त्याचे कोणतेही कागदपत्र त्यांना मिळालेले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील विस्तार अधिकारी पंचायत समिती यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी श्री बोंडे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी श्री जी. पी. नांदुरकर हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी श्री बोंडे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 9.10.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास ग्राम पंचायत कार्यालयामध्ये घर क्र. 1881 आणि घर क्र. 1482 (सुधारीत) मधील फेरफारा संदर्भात जी कागदपत्रे उपलब्ध होती ती कागदपत्रे अपीलकर्त्यास विनामूल्य उपलब्ध करुन दिलेली आहे. त्या कागदपत्रा व्यतिरिक्त इतर कोणतेही कागदपत्रे फेरफारा संबंधी ग्राम पंचायत कार्यालयामध्ये उपलब्ध नाही असे

जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. त्यावर अपीलकर्ता यांनी सदरची कागदपत्रे त्यांना प्राप्त झाल्याचे नमुद केले. मात्र ज्या कागदपत्रांच्या आधारे फेरफार घेण्याज आला आहे त्याची कोणतेही कागदपत्रे त्यांना प्राप्त झालेले नाही असे त्यांनी नमुद केले. तथापी याबाबत जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की सद्यस्थितीत ग्राम पंचायत कार्यालयामध्ये जी कागदपत्रे उपलब्ध आहेत ती कागदपत्रे अपीलकर्त्यास दिलेली आहे. या व्यतिरिक्त फेरफारा संबंधी त्यांच्या कार्यालयात कोणतेही कागदपत्रे उपलब्ध नाही. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास ही वस्तुस्थिती कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 3 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळवावे की अपीलकर्त्यास दि. 27.12.2010 आणि दि. 11.4.2011 रोजी जी कागदपत्रे दिलेली आहेत त्या व्यतिरिक्त फेरफारा संबंधी इतर कोणतेही कागदपत्रे ग्राम पंचायत कार्यालयाकडे उपलब्ध नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास व्यक्तीशः कळवावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2273-2274

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 827 नाग/2011

श्री सदानंद श्रावणजी गणवीर
यवतमाळ
ता. जि. यवतमाळ –445001 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी
मुख्यवनसंरक्षक कार्यालय (प्रादे.) वनवृत्त यवतमाळ
ता. जि. यवतमाळ
2) श्री डी. एस. जोशी
जन माहिती अधिकारी तथा वन अधिकारी(निर्देशन विभाग)
मुख्यवनसंरक्षक कार्यालय (प्रादे.) वनवृत्त यवतमाळ
ता. जि. यवतमाळ ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.9.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.4.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 16.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 15.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 22.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्यवनसंरक्षक कार्यालय (प्रादे.) वनवृत्त यवतमाळ यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन खालीलप्रमाणे 2 मुद्यांवर माहिती मागितलेली होती.

1) वन परिक्षेत्र अधिकारी आर. के. चव्हाण यांच्या विरुध्द केलेल्या कार्यवाहीची माहिती

2) उपोषणकर्ता श्री प्रशांत भानेगावकर यांनी दि. 9.12.2009 रोजी आपले कार्यालया समोर बसले असतांना त्यांची सांगता कशा पध्दतीने करण्यात आली याची माहिती त्यांनी मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून मुद्या क्र. 2 ची माहिती प्राप्त झाली मात्र मुद्या क्र. 1 ची माहिती त्यांना प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील विभागीय वन अधिकारी यवतमाळ यांचेकडे दाखल केले. मात्र त्यांचे प्रथम अपील फेटाळण्यात आले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा श्री डी. एस. जोशी हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 22.12.2009 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही त्यांच्या कार्यालयातील आस्थापना/योजना/दक्षता विभागाशी संबंधीत असल्यामुळे त्या संबंधित कक्षाकडून माहिती मागितली त्याप्रमाणे मुद्या क्र. 2 ची माहिती दक्षता विभागाकडून त्यांना दि. 5.2.2010 रोजी प्राप्त झाला. सदरची माहिती दि. 6.2. 2010 रोजी अपीलकर्त्यास पोस्टाने पाठविली. मात्र मुद्या क्र.1 च्या माहितीच्या संदर्भात तत्कालीन वन परिक्षेत्र अधिकारी उमरखेड यांनी केलेल्या अनियमितेबाबत महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1979 चे नियम 8 अंतर्गत विभागीय चौकशीची कार्यवाही पूर्ण व्हावयाची होती म्हणून सदरच्या मुद्यांची माहिती 30 दिवसात अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देता आली नाही. तथापी सदरची संपूर्ण चौकशी व शिस्तभंग विषयाक कार्यवाही ही दि. 28.7.2011 रोजी पूर्ण झालेली आहे आणि म्हणून त्याबाबतचे संपूर्ण कागदपत्रे उप वनसंरक्षक पुसद वन विभाग यांच्याकडून दि. 14.9.2011 च्या पत्राने प्राप्त झाले. आणि सदरची मुद्या क्र. 1 ची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आयोगासमोर उपलब्ध करुन दिली आणि सदरची माहिती अपीलकर्त्याने आयोगा समोर स्वीकृत केली. मात्र मुद्या क्र.1 च्या संदर्भात विलंबाने त्यांना माहिती प्राप्त झाल्याने जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत कार्यवाही व्हावी असे आग्रही प्रतिपादन आयोगा समोर केले.

4. अपीलकर्ता तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री डी. एस. जोशी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास त्यांच्या दि. 22.12.2009 च्या माहिती अर्जाला अनुसरुन मुद्या क्र. 2 ची माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि. 6.2.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली आहे मात्र मुद्या क्र. 1 ची माहिती आज आयोगा समोर सुनावणीच्या वेळी उपलब्ध करुन दिली. याबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री डी. एस. जोशी यांना विलंबाबद्यल खुलासा विचारला असता त्यांनी सांगितले की मुद्या क्र.1 च्या संदर्भात मागितलेली माहिती ही उप वनसंरक्षक पुसद वन विभाग यांच्याशी संबंधित होती तसेच श्री आर. के. चव्हाण तत्कालीन वन परिक्षेत्र अधिकारी उमरखेड यांनी केलेल्या अनियमितेबाबत महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1979 चे नियम 8 अंतर्गत विभागीय चौकशीची कार्यवाही प्रस्तावित करावयाची होती ती कार्यवाही आता पूर्ण झाल्यामुळे अपीलकर्त्यास विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिल्याचे सांगितले. तथापी जन माहिती अधिकारी यांनी विलंबाबद्यल केलेला खुलासा हा मान्य करण्यासारखा नाही. वास्तविक पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास मुद्या क्र.1 च्या संदर्भातील त्यावेळी जशी वस्तुस्थिती होती ती वस्तुस्थिती अपीलकर्त्यास कळविणे आवश्यक होते. म्हणून या विलंबास तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री डी. एस. जोशी हे जबाबदार दिसून येतात. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.
2) तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री डी. एस. जोशी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या दि. 22.12.2009 च्या माहिती अर्जातील मुद्दा क्र.1 च्या माहितीच्या संदर्भात 30 दिवसात कोणतीही वस्तुस्थितीदर्शक माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यानंतर आज आयोगा समोर सुनावणीच्या वेळी अपीलकर्त्यास मुद्दा क्र. 1 ची माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिलेलीदिसून येते. म्हणून विलंबास ते जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (2) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरच्या शिस्तभंगाची कार्यवाही ही मुख्यवनसंरक्षक वनवृत्त यवतमाळ यांनी किंवा सक्षम अधिकारी यांनी करावयाची आहे.
3) सदरच्या निर्णयाची एक प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी **मुख्यवनसंरक्षक वनवृत्त यवतमाळ** यांचेकडे पाठविण्यात येत आहे.
4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.2276-2278

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 837 नाग/2011**

श्री प्रभुदास नामाजी गजभिये
म्हाडा कॉलनी, एच.आय.जी.–11,
खात रोड भंडारा
ता. जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव
शालेय शिक्षण विभाग
मंत्रालय मुंबई–32
2) श्री विनोद बोंदरे
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,(माशि–5)
शालेय शिक्षण विभाग
मंत्रालय मुंबई–32 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.9.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 16.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 16.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस उत्तरवादी हजर आहेत. अपीलकर्ता हे सुनावणीस उशिरा हजर झाले.

2. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,(माशि–5) शालेय शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई श्री विनोद बोंदरे हे उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव यांच्या वतीने जन माहिती अधिकारी यांनाच प्राधिकृत करण्यात आले.

3. जन माहिती अधिकारी श्री विनोद बोंदरे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 29.1.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 1.2.2011 रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने सदरच्या माहितीच्या अर्जात त्यांच्याकडील दि. 4.1.2011 चे पत्र नोंदणी शाखेत कधी नोंदणी करण्यात आली त्या नोंदणी उता–याची प्रमाणीत प्रत मागितली होती. तसेच सदर पत्र प्रधान सचिव (शालेय शिक्षण) यांना चिन्हांकीत केले आहे काय असल्यास त्यांच्या स्वाक्षरीची प्रमाणीत प्रत मागितली होती. आणि शिक्षण उपसंचालक नागपूर यांना पत्र देतांना कोणत्या स्तरावरुन मान्यता देण्यात आली त्या टिपणीची प्रत त्यांनी मागितली होती.

4. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की मंत्रालयीन कामकाज पध्दतीनुसार अर्जदारानी कार्यासनात दिलेले निवेदन/पत्र कार्यासनाच्या नोंदणी पुस्तकात नोंद करण्यात येते. त्याकरीता विभागाच्या नोंदणी शाखेत नोद होण्याची आवश्यकता नाही. तसेच मंत्रालयीन कामकाज पध्दतीनुसार कामाचा निपटारा जलद गतीने व्हावा या उद्येशाने त्यांच्या अधिनस्थ कार्यालयाला नियमानुसार कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यासाठी कक्ष अधिकारी/उपसचिव यांच्या स्तरावरुनच पत्र निर्गमित करण्यात येते. तसेच कालापव्यय होवू नये आणि शाखेत कामाचा जलद निपटारा व्हावा या उद्येशाने केवळ सुचना देण्यासाठी टिपणी तयार

करुन वरीष्ठ अधिका–याची मान्यता घेण्याची आवश्यकता नसते. ही बाब लक्षात घेता अपीलकर्ता यांनी दि. 29.1.2011 च्या माहितीच्या अधिकाराखाली मागितलेल्या मुद्यांची माहिती दस्तऐवजाच्या स्वरुपात उपलब्ध नसल्याने दि. 22.2.2011 च्या पत्राने सदरची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे अपीलकर्त्यास कळविलेले आहे.

5. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उपसचिव यांचेकडे दाखल केले. त्या प्रथम अपीलाची सुनावणी दि. 29.4.2011 रोजी घेण्यात आली त्यावेळी अपीलकर्ता हे गैरहजर होते. त्यांचे यांचे म्हणणे असे आहे की प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 30.4.2011 रोजी प्रथम अपीलाचा निर्णय निर्गमीत केला. आणि त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली माहिती योग्य असल्याचे नमुद करुन अपीलकर्ता यांना त्यांच्याकडील दि. 4.1.2010 रोजी प्रधान सचिव यांना उद्येशून लिहिलेल्या पत्राची छायांकित प्रत देण्याचे आदेशित केले. त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्याकडील दि. 4.1.2010 च्या पत्राची छायांकित प्रत सांक्षांकित करुन दि. 30.4.2011 च्या प्रथम अपीलाच्या निर्णयासोबत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिले असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 29.1.2011 च्या माहिती अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 22.2.2011 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तसेच प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर दि. 30.4.2011 च्या प्रथम अपीलाच्या निर्णया सोबत देखील आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2279-2280

जा.क्र.––––––––– दि.................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 842 नाग/2011**

श्री केशव हिरामण तिराणिक
मु. पो. किल्ला वार्ड भद्रावती
ता. भद्रावती जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) डॉ. व्ही. डी. झारे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक
आरोग्य सेवा(हिवताप) नागपूर
श्रध्दानंदपेठ, माता कचेरी परिसर, नागपूर
2) जन माहिती अधिकारी
सहाय्यक संचालक आरोग्य सेवा(हिवताप) कार्यालय
नागपूर
श्रध्दानंदपेठ, माता कचेरी परिसर, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.9.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 16.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 16.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 14.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी हत्तरोग अधिकारी कार्यालय चंद्रपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन डब्लू. आर. बनकर यांच्या पदस्थापने बाबतची अ,ब,क,ड,इ व ई अशा 6 मुद्यांवर त्यांनी माहिती मागितलेली होती. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. 8.2.2011 च्या पत्राने असे कळविले की आपण मागितलेली माहिती ही वैयक्तीक स्वरुपाची असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 (1),(छ) आणि (ब) प्रमाणे पुरविता येत नाही असे त्यांना कळविले. म्हणून त्यांनी प्रथम अपील सहाय्यक संचालक यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील दि. 24.3.2011 च्या पत्राने आपण मागितलेली माहिती ही वैयक्तीक स्वरुपाची असल्यामुळे देता येत नाही असे अपीलकर्त्यास कळविले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी श्री डब्लू. आर. बनकर हत्तरोग अधिकारी चंद्रपूर हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक डॉ. व्ही. डी. झारे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री बनकर यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 14.1.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. तथापी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्याने त्याबाबत त्यांचे मत मागविण्यात आले आणि त्रयस्थ पक्षाने सदरची माहिती ही वैयक्तीक स्वरुपाची असल्यामुळे संबंधितास पुरविण्यात येवू नये असे कळविले. प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी हेच त्रयस्थ पक्ष आहेत. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 8.2.2011 च्या पत्राने आपण

मागितलेली माहिती ही वैयक्तीक स्वरुपाची असल्यामुळे उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील सहाय्यक संचालक यांचेकडे दाखल केले. आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील दि. 24.3.2011 च्या पत्राने आपण मागितलेली माहिती ही वैयक्तीक स्वरुपाची असल्यामुळे उपलब्ध करुन देता येत नाही असे अपीलकर्त्यास कळविल्याचे डॉ. व्ही. डी. झारे यांनी आयोगापुढे सांगितले.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने श्री डब्लू. आर. बनकर यांच्या संदर्भात अ,ब,क,ड,इ व ई इत्यादी मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. या मुद्यांचे अवलोकन केले असता श्री बनकर हे शासकीय सेवेत रुजू झाल्याबाबत त्यांच्या बदली संदर्भात आणि त्यांच्या पदोन्नती संदर्भात इत्यादी सेवा विषयक बाबींची त्यांनी माहिती मागितलेली आहे. कोणत्याही कर्मचा–याचे सेवा पुस्तक हे शासकीय कार्यालयात तयार करण्यात येत असते. म्हणून अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा समावेश हा सेवा पुस्तकातील नोंदी मध्ये असल्याचे दिसून येते. म्हणून श्री बनकर यांच्या सेवा पुस्तकाची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक व योग्य होईल. कारण माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 मधील तरतुदी नुसार सदरची माहिती कोणत्याही प्रकारे प्रगट करण्या पासून अपवपद केलेला नाही उलट शासनाच्या कार्यालयातील पारदर्शकता जनतेस दिसण्याच्या दृष्टिकोनातून सेवा शर्ती विषयी किंवा पदोन्नती विषयी नागरीकास माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास श्री डब्लू. आर. बनकर यांच्या सेवा पुस्तकाची छायांकित प्रत विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2282-2283

जा.क्र.––––––––– दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 908 नाग/2011**

सौ. अलकाबाई सुरेश ठवकर
मु. लोणारा पो. नवेझरी
ता. तिरोडा जि. गोंदिया – 441911 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय तिरोडा
ता. तिरोडा जि. गोंदिया
2) श्री वि. रा. कोकावार
जन माहिती अधिकारी
तहसिल कार्यालय तिरोडा
ता. तिरोडा जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.9.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक 10.6.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 18.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 16.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ती ही गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार तहसिल कार्यालय तिरोडा श्री वि. रा. कोकवार हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने त्यांनाच प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

4. जन माहिती अधिकारी श्री कोकवार यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्तीचा दि. 6.1.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 25.2.2011 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्तीने लोणारा येथील स्वस्त धान्य दुकानदारा बाबत ए.पी.एल., बी पी एल, अंत्योदय केरोसीन कार्डधारकांच्या नावाची यादी डी.1 रजिस्टरची प्रत तसेच दरमहाच्या साठा रजिस्टरवर विक्री रजिस्टरच्या प्रती दक्षता समितीची यादी तहसिलदार व अन्य अधिकारी यांनी स्वस्त धान्य दुकानदाराला दिलेल्या भेट अहवालाच्या प्रती इत्यादी बाबत 1 ते 9 मुद्यांवर व्यापक स्वरुपात माहिती मागितलेली होती. तसेच अपीलकर्ती ही दारीद्रय रेषेखालील असल्यामुळे दारीद्रय रेषेखालचे प्रमाणपत्र त्यांनी अर्जा सोबत जोडलेले होते. त्यामुळे अपीलकर्तीस विनामुल्य माहिती देणे अपेक्षित आहे. ही बाब लक्षात घेवून अपीलकर्तीने मागितलेल्या व्यापक स्वरुपातील माहितीपैकी जी माहिती संकलित करणे शक्य झाले ती माहिती संकलित करण्यात आली. त्यामध्ये ए.पी.एल., बी पी एल, अंत्योदयची डी.1 रजिस्टरची प्रत आणि दक्षता समितीच्या यादीची प्रत इत्यादी माहिती अपीलकर्तीस दि. 18.3.2011 च्या पत्राने पोस्टाद्वारे उपलब्ध करुन देयात आली आणि या माहिती सोबत अपीलकर्तीस असे देखील कळविण्यात आले की उर्वरीत मुद्यांवरील माहिती ही सुमारे 300 पानांची आहे म्हणून त्यापैकी आपणास जी आवश्यक आहे त्या माहितीचे निरीक्षण करण्यासाठी आपण या कार्यालयात उपस्थित राहावे आणि निरीक्षण केल्यानंतर आपण माहितीची निवड

केल्यानंतर ती माहिती आपणास उपलब्ध करुन देण्यात येईल असे देखील अपीलकर्तीस कळविण्यात आलेले होते. प्रस्तुत प्रकरणी जन माहिती अधिकारी श्री कोकवार यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की अपीलकर्तीने माहितीच्या अर्जात मागितलेल्या माहितीचे स्वरुप मोठया प्रमाणात होते तसेच अपीलकर्ती ही दारीद्रय रेषेखालील असल्यामुळे त्यांना विनामुल्य माहिती देणे अपेक्षित असल्यामुळे अपीलकर्तीस उपलब्ध करुन द्यावयाची माहिती ही व्यापक स्वरुपात आहे म्हणून अपीलकर्ती त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाल्यास अपीलकर्तीस जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या व्यतिरिक्त इतर माहिती त्यांनी निरीक्षणा नंतर मागणी केल्यास ती देखील त्यांना उपलब्ध करुन देण्यास त्यांनी आयोगा समोर मान्यता दिली. तथापी अपीलकर्ती त्यांच्या कार्यालयात माहितीचे निरीक्षण करण्यास हजर झालेले नाही म्हणून उर्वरीत माहिती त्यांना देता आली नाही तथापी जी माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध होती ती दि. 18.3.2011 च्या पत्राने अपीलकर्तीस पाठविल्याचे त्यांना आयोगापुढे सांगितले.

5. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्तीस दि. 18.3.2011 च्या पत्राने त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती पोस्टाने पाठविलेली आहे. तथापी अपीलकर्तीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप मोठया प्रमाणात असल्यामुळे अपीलकर्तीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पाहिजे असलेल्या माहितीचे निरीक्षण करुन घेवून निरीक्षणाअंती जी माहिती पाहिजे आहे ती उपलब्ध करुन घेता येईल म्हणून अपीलकर्तीचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्तीचे यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस माहितीचे निरीक्षण करण्यासाठी तारीख व वेळ कळवावी आणि त्यानुसार अपीलकर्तीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून माहितीचे निरीक्षण करुन घ्यावे आणि निरीक्षणाअंती त्यांना पुन्हा पाहिजे असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2285-2286

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 909 नाग/2011**

श्री नारायण शंकरराव डाखळे
वानाडोंगरी
पो. ता. हिंगणा जि. नागपूर –441110 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री बंटेवार पोलीस उपनिरीक्षक
प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त
परिमंडळ क्र.1 सिताबर्डी, नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री अंगद तुकाराम उईके
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त
एम.आय.डी.सी. विभाग नागपूर शहर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.9.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 8.6.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 18.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 17.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही.

3. मात्र आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त एम.आय.डी. सी. विभाग नागपूर श्री उईके हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त परिमंडळ क्र.1 सिताबर्डी, नागपूर यांच्या वतीने
श्री बंटेवार पोलीस उपनिरीक्षक हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री उईके यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 29.12.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 7.1.2011 रोजी प्राप्त झाला होता. तथापी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही वरीष्ठ पोलीस निरीक्षक एम.आय.डी.सी. नागपूर यांचेशी संबंधीत असल्याने दि. 10.1.2011 रोजी पत्र पाठवून त्यांच्याकडून माहिती मागितली. पुन्हा त्यांना दि. 19.1.2011 च्या पत्राने स्मरणपत्र पाठविले आणि दि. 7.2.2011 च्या पत्राने पुन्हा स्मरणपत्र दिले. अशा प्रकारे जन माहिती अधिकारी यांनी या माहितीचा पाठपुरावा केला आणि त्यानंतर संबंधीत पोलीस स्टेशन यांनी दि. 10.2.2011 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी सदरची माहिती ही अपूर्ण असल्याने पुन्हा संबंधीत पोलीस स्टेशनकडून पूर्ण माहिती प्राप्त करुन घेण्यात आली आणि सदरची माहिती प्राप्त झाल्यानंतर अपीलकर्त्यास दि. 11.2.2011 रोजी मोबाईलवर फोन करुन माहिती घेवून जाण्याकरीता कळविले. तथापी अपीलकर्ता दि. 11.2.2011 रोजी कार्यालयत हजर झाले नाही म्हणून त्यांना पुन्हा दि. 14.2.2011 रोजी मोबाईलवर फोन करुन

माहिती घेवून जाण्याकरीता कळविले. त्यानुसार अपीलकर्ता दि. 15.2.2011 रोजी कार्यालयत हजर झाले आणि अपीलकर्ता यांस दि. 15.2.2011 रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याची पोच त्यांनी आयोगापुढे दाखविली.

5. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील पोलीस उपआयुक्त परिमंडळ क्र.1 यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली प्रथम अपीलाच्या निर्णयात अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अपीलकर्त्याचे समाधान करुन देण्यात आले. आणि प्रथम अपील हे निकाली काढल्याचे नमुद केले.

6. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन दि. 12.2.2011 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. आणि सदरची माहिती अपीलकर्त्यास दि. 15.2.2011 रोजी प्राप्त झालेली दिसते. तथापी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयात नमुद केल्याप्रमाणे या प्रकरणात सहाय्यक पोलीस आयुक्त एम.आय.डी.सी. हे स्थळ चौकशी करतील आणि त्या चौकशीच्या आधारे योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल असे नमुद केलेले असल्यामुळे प्रस्तूत प्रकरणात ही वस्तुस्थीती अपीलकर्त्यास कळविणे याग्य होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त एम.आय.डी.सी. यांनी अपीलकर्त्यास असे कळवावे की या प्रकरणात सहाय्यक पोलीस आयुक्त एम.आय.डी.सी. हे स्थळ चौकशी करतील आणि त्या चौकशीच्या आधारे पुढील योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल असे अपीलकर्त्यास विनामुल्य रजिस्टर पोस्टाने कळवावे तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी केलेल्या चौकशीची माहिती देखील अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2288-2289

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 844 नाग/2011**

श्री नत्थुजी सदाशिवराव मसराम
आदर्श नगर श्रीराम मंदीर समोर, भुखंड क्र.1,
आदिवासी ले–आऊट उमरेड रोड नागपूर
ता. जि. नागपूर –440009 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अध्यक्ष/सचिव
मागासवर्गीय आदीवासी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. नागपूर
चामट चौक जवळ, उमरेड रोड नागपूर
2) जन माहिती अधिकारी
मागासवर्गीय आदीवासी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. नागपूर
चामट चौक जवळ, उमरेड रोड नागपूर
3) श्री आर. डी. कौसडीकर
जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक
सहकारी संस्था नागपूर शहर नागपूर
हिंदुस्थान अमरावती रोड नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.9.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 16.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 17.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 15.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर शहर नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन मागासवर्गीय आदीवासी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. र. नं.311 (दिघोरी) नागपूर या संस्थेबाबत माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर शहर नागपूर श्री आर. डी. कौसडीकर हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की सदरच्या मागासवर्गीय आदीवासी गृहनिर्माण सहकारी संस्थेला

शासनाचे कोणतेही वित्तीय सहाय्य किंवा अनुदान प्राप्त झालेले नाही. तथापी या संस्थे विषयी अशाच प्रकारची माहिती या पुर्वी मागितलेली होती. त्या संदर्भात आयोगाकडे अपील क्र. 503/2011 दाखल झाले होते. आणि त्या अपीलाचा निर्णय आयोगाने दि. 13.7.2011 रोजी निर्गमित केलेला आहे आणि आयोगाकडील दि. 13.7.2011 च्या निर्णयाला अनुसरुन अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 26.8.2011 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली होती. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे सुनावणीत मान्य केले. मात्र त्या माहिती सोबत संस्थेचे ऑडीट रिपोर्ट प्राप्त झाले नाही असे त्यांना नमुद केले. म्हणून आज आयोगा समोर उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर शहर यांनी अपीलकर्त्यास सदरच्या संस्थेचे दि. 1.4. 2001 ते दि. 31.2.2011 या दहा वर्षाच्या कालावधीच्या ऑडीट रिपोर्टच्या प्रती विनामुल्य उपलब्ध करुन दिल्या. सदरच्या प्रती अपीलकर्त्याने आयोगासमोर स्वीकृत केल्या.

4. अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या कडून वरील प्रमाणे आवश्यक ती माहिती उपलब्ध झाल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2291-2292

जा.क्र.———————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 843 नाग/2011**

श्री कैलास रामचंद्रराव श्रीरामे
C/o. श्री हिरामणजी वाघमारे, 30 म्हडा कॉलनी
बोरनाल्या जवळ काटोल रोड नागपूर
ता. जि. नागपूर – 13 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पाटील
प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्रीमती पतंगे
जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक
शिक्षण विभाग (माध्यमिक) जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.9.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 16.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 17.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 10.3.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक शिक्षण विभाग (माध्यमिक) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन अपराधिक जनहित याचिका क्र. 6/6/2004 च्या संबंधात मा. उच्च न्यायालयात शिक्षणाधिकारी यांनी दाखल शपथपत्र दि. 6.12.2004 मध्ये रु. 1,18,137/– कर्मचा–याच्या वेतनभत्त्याची वसूली सन 1994–1995 आणि 1995–1996 च्या आदेशानुसार करण्यात आल्याचे नमुद केले आहे. त्यामध्ये शिक्षणाधिकारी यांच्या दि. 24.11.1995 च्या आदेशाचा उल्लेख सुध्दा आहे. त्या आदेश पत्राची प्रमाणीत प्रत आणि संबंधीत चौकशी अहवालाची प्रत तसेच दि. 6.12.2004 च्या शपथपत्राची प्रमाणीत प्रत त्यांनी मागितलेली होती. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. 31.3.2011 च्या पत्राने असे कळविले की

आपण मागितलेल्या माहितीचा शोध कार्यालयात घेण्यात आला तथापी संबंधीत नस्ती उपलब्ध होत नसल्याने माहिती पुरविणे शक्य होत नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी यांचेकडे दाखल केले. शिक्षणाधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयात उपशिक्षणाधिकारी श्री साखरे यांनी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात कळविले. तथापी त्यानंतरही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी श्रीमती पतंगे हया उपस्थित होत्या. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर श्री पाटील हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्रीमती पतंगे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 10.3.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात शोधण्यात आली तथापी सदरची माहिती ही सुमारे सहा वर्षा पूर्वीची असल्यामुळे त्यांच्या कार्यालयात संबंधीत नस्ती आढळून आली नाही म्हणून अपीलकर्त्यास दि. 31.3.2011 च्या पत्राने माहिती उपलब्ध नाही असे कळविण्यात आले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील शिक्षणाधिकारी यांचेकडे दाखल केले. शिक्षणाधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयात उपशिक्षणाधिकारी श्री साखरे यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविले. तथापी उपशिक्षणाधिकारी श्री साखरे यांनी त्यांचे अभिप्राय दि. 31.6.2011 रोजी कळविले. आणि त्यामध्ये असे नमुद केले की अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात नस्तीचा शोध घेण्यात आला. तथापी सदरची नस्ती त्यांना उपलब्ध झाली नाही तसेच न्यायालयीन याचिका नोंदवही तपासणी केली असता त्यामध्ये अपीलकर्त्याने नमुद केलेले रिट पिटीशन क्र. 616/2004 ची नोंद त्यामध्ये दिसून आली नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे श्री साखरे यांनी कळविले. त्यानुसार पुन्हा दि. 11.7.2011 च्या पत्राने माहिती उपलब्ध नाही असे कळविण्यात आले. सदरचे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की माहितीच्या अर्जात मागितलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील जुन्या नस्तीमध्ये उपलब्ध होण्याची शक्यता आहे. म्हणून त्या नस्तीच्या निरीक्षणाची परवानगी त्यांना देण्यात यावी. त्यावर जन माहिती अधिकारी श्रीमती पतंगे यांनी आयोगा पुढे सांगितले की अपीलकर्त्यास दि. 30.8.2011 च्या पत्राने यापुर्वीच अभिलेख निरीक्षणाचे कळविलेले आहे. मात्र सदरचे पत्र अद्यापपर्यंत अपीलकर्त्यास प्राप्त झाले नाही असे त्यांनी नमुद केले. म्हणून त्या पत्राची एक झेरॉक्स प्रत आयोगासमोर अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. म्हणून अपीलकर्ता निरीक्षणास त्यांच्या कार्यालयात हजर झाल्यास त्यांना दस्तऐवजाचे निरीक्षण करण्यास दस्तऐवज उपलब्ध करुन देणे संयुक्तीक होईल. म्हणून अपीलकर्ता आणि जन माहिती

अधिकारी यांच्या संमतीने आयोगासमोर असे ठरविण्यात आले की अपीलकर्ता यांनी दि. 19.9.2011 रोजी दुपारी 12.00 वाजता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात रेकॉर्डचे निरीक्षण करण्यासाठी हजर राहावे आणि निरीक्षणा नंतर माहिती उपलब्ध झाल्यास जन माहिती अधिकारी यांनी ती माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येते.
2) अपीलकर्ता यांनी दि. 19.9.2011 रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दुपारी 12.00 वाजता रेकॉर्डचे निरीक्षण करण्यासाठी हजर राहावे आणि अपीलकर्ता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हजर झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक तो रेकॉर्ड अपीलकर्त्यास निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावा. आणि निरीक्षणा नंतर अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती उपलब्ध झाल्यास ती विनामुल्य देण्यात यावी.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2294-2296

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 851 नाग/2011**

श्री मनोज मधुकरराव बिनेकर
जुनी मंगळवारी, मठ्ठीपूरा वार्ड नं.73 नागपूर
ता. जि. नागपूर – 02 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक
सहकारी संस्था नागपूर
धनवटे चेम्बर्स सिताबर्डी नागपूर
2) श्री गौतम वालदे
जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था नागपूर
प्लॉट नं. 8 हिंदुस्थान कॉलनी अमरावती रोड
सहकार सदन नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.9.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 26.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 18.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 19.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 6.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी पत संस्था नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन तिरुपती बालाजी सहकारी संस्था मर्या. नागपूर या संस्थेचे सन 2006–2007, 2007–2008, 2008–2009 आणि 2009–2010 या चार वर्षाच्या ऑडीट अहवालाच्या प्रती त्यांनी मागितलेल्या होत्या. त्यांना 2006–2007, 2008–2009 आणि 2009–2010 या वर्षाच्या ऑडीट अहवालाच्या प्रती मिळाल्या. मात्र 2007–2008 या वर्षाच्या ऑडीट अहवालाची प्रत त्यांना मिळाली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था नागपूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीला नंतरही त्यांना सन 2007–2008 या वर्षाचे ऑडीट अहवाल त्यांना मिळाला नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक श्री गौतम वालदे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था नागपूर यांच्या वतीने श्री कौसडीकर उपनिबंधक हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री गौतम वालदे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की सदरच्या सहकारी पत संस्थेला शासनाचे कोणत्याही प्रकारचे अनुदान तथा वित्तीय सहाय प्राप्त झाले नाही. तथापी सहकारी कायद्यातील तरतुदीला अनुसरुन अपीलकर्त्यास सन 2006–2007, 2008–2009 आणि 2009–2010 या तीन वर्षाची प्रत त्यांना देण्यात

2

आलेली आहे आणि सन 2007–2008 या वर्षाची ऑडीट अहवालाची प्रत त्यांना संस्थेकडून प्राप्त करुन घेवून अपीलकर्त्यास सदरची प्रत घेवून जाण्याबाबत कळविलेले आहे मात्र अपीलकर्त्याने सदरची प्रत अद्याप घेतलेली नाही. त्यावर अपीलकर्त्याने आयोगा पुढे असे सांगितले की त्यांना जिल्हा उपनिबंधकाकडून सन 2007–2008 च्या अहवालाची प्रत घेवून जाण्याबाबत कळविलेले आहे. म्हणून ते जिल्हा उपनिबंधक कार्यालयात जावून सदरची प्रत उपलब्ध करुन घेण्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की सदरच्या संस्थेला कोणत्याही प्रकारचे शासकीय अर्थसहाय प्राप्त झाले नसल्यामुळे या संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी लागू होत नाही तथापी जिल्हा उपनिबंधकानी महाराष्ट्र सहकारी अधिनियम 1960 च्या तरतुदीला अनुसरुन अपीलकर्त्यास वर नमुद केल्याप्रमाणे ऑडीट रिपोर्टच्या प्रती घेवून जाणे बाबत कळविल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.2298-2299

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 852 नाग/2011**

श्री नागोराव पुंडलिकराव घोंगे
प्लॉट नं. 17 राष्ट्रसंत नगर, झिंगाबाई टाकळी
गोधनी रोड नागपूर
ता. जि. नागपूर – 30 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर शहर–2
प्लॉट नं. 8 हिंदुस्थान कॉलनी अमरावती रोड
सहकार सदन नागपूर
2) श्री कौसडीकर
जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक
सहकारी संस्था नागपूर शहर–2
प्लॉट नं. 8 हिंदुस्थान कॉलनी अमरावती रोड
सहकार सदन नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.9.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 26.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 18.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 19.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 15.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर शहर–2 यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन दि एम्प्रेस मिल कर्मचारी पत संस्था मर्या. नागपूर या संस्थेच्या 659 कर्मचा–यांना कर्ज देण्यात आले त्याची यादी त्यांनी मागितलेली होती. कारण सदरच्या संस्थेमध्ये आर्थीक भ्रष्टाचार झालेला असल्यामुळे सदर संस्थेवर कार्यवाही व्हावी अशी त्यांनी आयोगापुढे मागणी केली.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक श्री कौसडीकर हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की सदरची सहकारी संस्था ही एम्प्रेस मिल कर्मचा–याची पत संस्था आहे. सदरच्या संस्थेस शासनाकडून कोणत्याही प्रकारचे

कर्ज अथवा अनुदान प्राप्त झालेले नाही. म्हणून मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे सदरच्या संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी लागू होत नाही. तथापी सदरची संस्था ही सहकारी कायद्याखाली नोंदणी झाली असल्यामुळे अपीलकर्त्यास त्यांच्या कार्यालयाकडून 2313 कर्जदार सभासदांची यादी उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची यादी अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे सुनावणीत मान्य केले. मात्र अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की 659 सभासदांना दिलेल्या कर्जामध्ये अफरातफर झालेली आहे म्हणून त्या संदर्भात कार्यवाही होणे आवश्यक आहे. म्हणून प्रस्तूत प्रकरणात अपीलकर्त्याची कार्यवाही करण्याची मागणी असल्यामुळे अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून संस्थे संदर्भात त्यांच्या कार्यालयाकडून करण्यात येत असलेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी उपस्थित राहून उपनिबंधकानी सदर संस्थेबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती प्राप्त करुन घ्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2301-2302

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 853 नाग/2011**

श्री रमेश रामभाऊ जोशी
आकांक्षा 13, प्रताप नगर जुने आर.टी.ओ.मागे वर्धा
ता. जि. वर्धा – 442001 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
वर्धा
ता. जि. वर्धा
2) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय देवळी
ता. देवळी जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.9.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 18.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 19.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 17.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार देवळी यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन शासनाच्या महाराष्ट्र रेव्हेन्यू मॅन्यूअल नुसार किंवा तत्संबंधी परिपत्रकानुसार अधिकार अभिलेख (7/12) मध्ये वारसदारांची नावे घेण्यासाठी व वगळण्यासाठी कुठले दस्तऐवज जोडावे लागतात या संदर्भात 1 ते 6 मुद्यांवर माहिती मागीतली होती त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली. परंतू त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपविभागीय अधिकारी वर्धा यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी झाली परंतू प्रथम अपीलाचा निर्णय त्यांना मिळाला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार श्री सरवदे हे उपस्थित होते. आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने देखील त्यांनाच प्राधिकृत केलेले आहे.

4. जन माहिती अधिकारी श्री सरवदे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 17.12.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 20.12.2010 रोजी प्राप्त झाला होता. सदरच्या माहितीच्या अर्जात अपीलकर्त्याने वर नमुद केल्याप्रमाणे शासनाच्या महाराष्ट्र रेव्हेन्यू मॅन्यूअल प्रमाणे किंवा परिपत्रकानुसार अधिकार अभिलेख (7/12) मध्ये वारसदारांची नावे नोंदण्यासाठी व वगळण्यासाठी कुठले दस्तऐवज जोडावे लागतात या संदर्भात 1 ते 6 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. 6.1.2011 च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उपविभागीय अधिकारी वर्धा यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 15.2.2011 रोजी घेण्यात आली. आणि जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास 6 मुद्यांवर व्यवस्थित माहिती दिली. म्हणून प्रथम

अपील फेटाळण्यात आले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयाची प्रत अपीलकर्त्यास प्राप्त झाली नाही असे अपीलकर्त्याने आयोगापुढे सांगितले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास असे सांगितले की प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपील फेटाळल्याबाबतची माहिती अपीलकर्त्यास दिली होती. म्हणून प्रथम अपीलाच्या निर्णयाची प्रत त्यांना पाठविलेली नाही.

5. वास्तविक पाहता प्रथम अपीलाची सुनावणी झाल्यानंतर प्रथम अपीलाचा निर्णय निर्गमित करुन त्याची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही. म्हणून याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांना सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात याबाबतची पुनरावृत्ती करु नये अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

6. तथापी जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्याकडील दि. 17.12.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन दि. 6.1.2011 च्या पत्राने 1 ते 6 मुद्यांची आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.2304-2305

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 911 नाग/2011**

श्री कासीम खान व. अहमद खान
कादर झंडा
पो. ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पांढरे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद कामठी
ता. कामठी जि. नागपूर
2) श्री बोरकर
जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता
नगर परिषद कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.9.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 8.6.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 18.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 19.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता नगर परिषद कामठी श्री बोरकर हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद कामठी श्री पांढरे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री बोरकर यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 21.2.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. सदरच्या माहितीच्या अर्जात अपीलकर्त्याने संजय नगर चौक (पुरानी दारुभट्टी) कामठी येथे दरवर्षी राष्ट्रीय ध्वज फडकविण्यात येत असतो. त्या सार्वजनिक ठिकाणी लोहा, सिमेंट कॉक्रीट इत्यादीचा वापर करुन अवैध इमारत बांधकामाबाबत नगर परिषदेने केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अवैध बांधकामा संदर्भात घर क्रमांक अथवा निर्माणकर्ता यांचे नाव दिलेले नसल्यामुळे त्या माहितीचा स्पष्ट बोध झाला नाही म्हणून दि. 14.3.2011 च्या पत्राने अपीलकर्त्यास असे कळविले की आपल्या माहितीच्या अर्जाला अनुसरुन संजय नगर चौक (पुरानी दारुभट्टी) कामठी येथे सुरु असलेल्या बांधकामाबाबत आपल्या अर्जामध्ये घर क्रमांक अथवा निर्माणकर्ता यांचे नाव दर्शविलेले नाही तसेच नगर परिषदेने बांधकाम विभागामध्ये शोध घेतला असता संजय नगर चौक येथे बांधकामा संबंधी कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही अशी माहिती अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली. तथापी त्यानंतर

अपीलकर्त्याने प्रथम अपील मुख्याधिकारी नगर परिषद कामठी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 25.4.2011 रोजी घेण्यात आली. तत्पूर्वी जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा सर्व्हेअर पाठवून त्यांच्याकडून अवैध बांधकामाबाबत अहवाल मागविला. त्यावेळी सर्व्हेअरच्या निदर्शनास आले की अपीलकर्त्याने नमुद केलेल्या ठिकाणी बांधकामाची सुरुवात झालेली होती. तथापी ते बांधकाम निश्चित कोणी केलेले आहे याचा उलगडा होत नव्हता त्याचा पुन्हा शोध घेतला असता आणि स्थानिक चौकशी वरुन असे निदर्शनास आले की प्रस्तूत बांधकाम हे साई मित्र मंडळ संजय नगर कामठी यांनी सरु केल्याचे निदर्शनास आले म्हणून नगर परिषदेने दि. 2.5.2011 च्या पत्राने अवैध बांधकामा संदर्भात अध्यक्ष/सचिव साई मित्र मंडळ संजय नगर कामठी यांना नोटिस पाठविली आणि आणि त्यामध्ये सदरचे बांधकाम त्वरीत बंद करावे असे कळविले. त्याला अनुसरुन सद्यस्थितीत त्या जागेवर बांधकाम करण्याची कार्यवाही थांबविलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. आणि अपीलकर्त्यास दि. 2.5.2011 च्या नोटिसीची प्रत उपलब्ध करुन दिली. आणि सदरची प्रत अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याची पोच जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे दाखविली.

6. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. 21.2.2011 च्या माहिती अर्जाला अनुसरुन 30 दिवसाच्या मुदतीत म्हणजे दि. 14.3.2011 रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. त्यानंतर प्रथम अपीलाच्या निर्णया नुसार पुन्हा दि. 12.5.2011 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2307-2308

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 859 नाग/2011**

श्री अशोक किसनराव कोंडावार
प्लॉट नं. 7 मिलींद सोसायटी ले–आऊट नरेन्द्र नगर नागपूर
ता. जि. नागपूर – 15 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त
द्वारा पोलीस स्टेशन गणेशपेठ नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री रमेश पावडे
जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त
द्वारा पोलीस स्टेशन गणेशपेठ नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.9.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 18.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 20.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांच्या वतीने श्री आवळे हे हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांनी दि. 7.3.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त पोलीस स्टेशन गणेशपेठ नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचेकडे अपीलकर्ता यांचा दि. 17.4.2008 रोजी तक्रार अर्ज सादर केला. या तक्रार अर्जावर पोलीस स्टेशन गणेशपेठ यांनी श्री जयंत धोटे, प्रमोद चंद्रगिरीवार, श्रीराम डहाके, प्रशांत धांडे व इतर यांचे बयाणाची झेरॉक्स मागितलेली होती. तथापि त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त पोलीस स्टेशन गणेशपेठ नागपूर श्री रमेश पावडे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त परिमंडळ 3 यांच्या तर्फे श्री कोरेटी पोलीस उपनिरीक्षक हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री रमेश पावडे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 7.3.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 9.3.2011 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती पोलीस स्टेशन गणेशपेठ यांचेशी संबंधीत असल्याने पोलीस स्टेशन गणेशपेठ यांच्या कार्यालयात सदरचा माहितीचा अर्ज पाठविण्यात आला होता. पोलीस स्टेशन गणेशपेठ यांनी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती तयार केली आणि त्यांनी सदरची माहिती दि. 14.5.2011 रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे सादर केली. त्यानंतर अपीलकर्त्यास माहिती घेवून जाण्याबाबत फोन द्वारे वारंवार सुचना दिल्या परंतू ते हजर

झाले नाही म्हणून दि. 16.6.2011 रोजी सदरची माहिती पोस्टाने अपीलकर्त्यास पाठविण्यात आली. सदरची माहिती दि. 16.6.2011 रोजी पोस्टाने पाठविल्या बाबतचा मुळ जावक रजिस्टरचा पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सादर केला. त्यावरुन सदरची माहिती पोस्टाद्वारे अपीलकर्त्यास पाठविल्याचे दिसून येते. तथापी सदरची माहिती अपीलकर्त्यास पोस्टाद्वारे मिळाली नाही असे अपीलकर्त्याने आयोगापुढे सुनावणीत नमुद केले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्यास दि. 16.6.2011 रोजी पाठविण्यात आलेल्या माहितीची एक जादा प्रत त्यांनी अपीलकर्त्यास आयोगा समोर विनामुल्य उपलब्ध करुन दिली ती अपीलकर्त्याने आयोगा समोर स्वीकृत केली.

5. तसेच प्रस्तूत प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने उपस्थित असलेले पोलीस उपनिरीक्षक श्री कोरेटी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा प्रथम अपीलाचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेला नाही म्हणून प्रथम अपीलाचा निर्णय देण्याचा प्रश्न उपस्थित झाला नाही.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 16.6.2011 च्या पत्राने पोस्टाद्वारे पाठविलेल्या माहितीची पुन्हा जादा प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती प्राप्त झाली. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2298-2299

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 862 नाग/2011**

श्री महादेवराव भुजाडे
प्लॉट नं. 19 संत केशरमाता नगर हुडकेश्वर रोड नागपूर
ता. जि. नागपूर – 440039 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री उमाठे अधिक्षक
प्रथम अपीलीय अधिकारी तथा धर्मदाय उपायुक्त
नागपूर
ता. जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा सचिव/अध्यक्ष
अ.भा.विश्वकर्मामय विकास मंडळ
जगनाडे चौक, नंदनवन, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.9.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 18.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 20.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 30. 3.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव/अध्यक्ष अ.भा.विश्वकर्मामय विकास मंडळ नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन त्या मंडळा विषयी 1 ते 17 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना सचिव यांनी दि. 7.4.2011 च्या पत्राने असे कळविले की आपण मंडळाच्या कार्यालयात उपस्थित राहून माहिती प्राप्त करुन घ्यावी. त्याप्रमाणे ते मंडळाच्या कार्यालयात गेले परंतू त्यांना कोणतीही माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील धर्मदाय उप आयुक्त नागपूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 27.5.2011 रोजी देण्यात आला मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सचिव/अध्यक्ष अ.भा.विश्वकर्मामय विकास मंडळ हे उपस्थित झाले नाही. होते. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी तथा धर्मदाय उपायुक्त यांच्या वतीने श्री उमाटे हे उपस्थित होते. श्री उमाटे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अ.भा.विश्वकर्मामय विकास मंडळ नागपूर ची नोंदणी ट्रस्ट ॲक्ट खाली झालेली आहे. तथापी या मंडळास शासनाचे कोणतेही वित्तीय सहाय्य कर्ज रुपात किंवा अनुदान रूपात प्राप्त झालेले नाही तसेच अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही त्या मंडळाशी संबंधित असल्याने त्या मंडळा कडूनच अपीलकर्त्याने माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे. तसेच जी माहिती धर्मदाय उपायुक्त यांच्या कार्यालयात आहे ती माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्याचा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला आहे. त्यानुसार धर्मदाय उपायुक्त कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्त्यास देता येईल असे श्री उमाटे यांनी आयोगापुढे सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने उपस्थित असलेले श्री उमाटे यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की सदर मंडळास शासनाचे कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त झालेले नाही. तथापी सदरचे मंडळ ट्रस्ट ॲक्ट खाली नोंदणी झालेली असल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी तथा धर्मदाय उपायुक्त यांच्या कडील दि. 27.5.2011 च्या प्रथम अपीलात दिलेल्या निर्णया प्रमाणे अपीलकर्त्याने धर्मदाय उपायुक्त नागपूर कार्यालयात हजर राहून माहिती त्यांच्या कडून प्राप्त करुन घेणे संयुक्तीक होईल. तसेच या मंडळात गैरव्यवहार झालेल्या आहेत त्यांच्या देखील तक्रारी आहेत असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. म्हणून अपीलकर्ता यांनी मंडळाच्या तक्रारी संबंधात सक्षम अधिकारी यांचेकडे दाद मागणे संयुक्तीक होईल. तथापी अपीलकर्त्याने धर्मदाय उपायुक्त नागपूर कार्यालयात हजर राहून माहिती प्राप्त करणे संयुक्तीक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा धर्मदाय उपायुक्त यांच्या कार्यालयात हजर राहून प्रथम अपीलाच्या निर्णयात नमुद केलेली माहिती त्यांच्या कार्यालया कडून प्राप्त करुन घ्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.2297-2298

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.